# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्रं. - १६** **// महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.१९/१२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १९/१२/२०१९ गुरुवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर . सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सिमा सुरेश भोळे , महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील प्रतिभा सुधिर | पाटील राजेंद्र झिपरु |
| नेरकर सरिता अनंत | पाटील चंद्रशेखर शिवाजी | महाजन सुनिल सुपडू |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे मयुर चंद्रकांत | महाजन जयश्री सुनिल |
| खान रुकसानाबी गबलु | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोजकुमार नारायणदास |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरीफ | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | पाटील कुलभुषण विरभान | खडके सुनिल वामनराव |
| सोनवणे भारती कैलास | भिल पार्वताबाई दामु | खडके विश्वनाथ सुरेश |
| चौधरी चेतना किशोर | पाटील उषा संतोष | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम (**निलंबीत**) |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे सिंधु विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| भंगाळे विष्णू रामदास | कोल्हे ललित विजय | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे राखी शामकांत | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा (**निलंबीत**) |
| तायडे ज्योती शरद | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| लढढा नितीन बालमुकुंद | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | कैलास नारायण सोनवणे |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| **ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह** | मराठे जितेंद्र भगवान | मराठे राजेंद्र नारायण |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | चौधरी महेश रतन |
| पाटील सचिन भिमराव | सोनवणे सुरेखा सुदाम | जैन भागचंद मोतीलाल |
| भोईटे लता रणजीत | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा. आयुक्त , डॉ.उदय टेकाळे , मा.उपायुक्त.श्री.मिनीनाथ दंडवते, मा.उपायुक्त.श्री.उत्कर्ष गुटे , मा.उपायुक्त.श्री.अजित मुठे, मुख्यलेखापरिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.काळे दिपमाला मनोज, सौ.बेंडाळे उज्वला मोहन व सन्मा. सदस्य श्री.कोल्हे प्रविण रामदास यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२२३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | **१) सौ.भोळे सिमा सुरेश,<br>मा.महापौर** | १) मा.आ.स्मिताताई वाघ यांचे पति व माजी भा.ज.पा.जळगांव जिल्हाध्यक्ष, कै.उदय भिकनराव वाघ यांचे दु:खद निधनाबद्दल.<br>२) माजी नगरसेवक श्री.किशोर चौधरी यांचे बंधू स्व.अरुण चौधरी,<br>३) मु.जे.महाविदयालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक स्व.प्रा.डॉ.सुका रामदास चिरमाडे,<br>४) स्व.गणेश भिकमचंद जोशी,<br>५) स्व.शंकरराव हरी चौधरी<br>६) भा.ज.पा.सरचिटनिस श्री.दिपक सुर्यवंशी यांच्या जेष्ठ भगिनी स्व.अलका दिलीप देसले,<br>७) भाजपा पदाधिकारी श्री.महेश जोशी यांचे बंधू स्व.विश्वेश सुभाष जोशी,<br>८) श्री.शैलेंद्र व श्री.सुनिल चिरमाडे यांच्या मातोश्री स्व.चंद्रीकाबाई वसंतराव चिरमाडे तसेच<br>९) फोटोग्राफर श्री.अतुल वडनेरे व श्री.संजय वडनेरे यांचे वडील स्व.फतरुशेठ वडनेरे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | **१) डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे,<br>मा.उपमहापौर<br>२) श्री.कोल्हे ललित विजयराव<br>३) श्री.भंगाळे विष्णू रामदास<br>४) डॉ.श्री.पाटील चंद्रशेखर शिवाजीराव<br>५)श्री.बाविस्कर किशोर रमेश<br>६)सौ.राणे गायत्री इंद्रजित<br>७)सौ.तायडे सुरेखा नितीन** | १) मा.आ.स्मिताताई वाघ यांचे पति व माजी भा.ज.पा.जळगांव जिल्हाध्यक्ष, कै.उदय भिकनराव वाघ यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | **१)डॉ.श्री.सोनवणे अश्विन शांताराम,<br>मा.उपमहापौर<br>१)श्री.बाविस्कर किशोर रमेश<br>२)श्री.चौधरी महेश रतन<br>४)श्री.सनकत चेतन गणेश<br>५)सौ.कोल्हे सिंधू विजयराव** | १) माजी नगरसेवक श्री.किशोर भाऊलाल चौधरी यांचे बंधू तथा सन्मा.सदस्या, सौ.चेतना किशोर चौधरी यांचे जेठ स्व.अरुण चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | **श्री.कोल्हे ललित विजयराव** | १) विवेकानंद नगर येथिल श्री.श्रीधर किनगे यांचे वडील स्व.बारसु किनगे<br>२) यशवंत नगर येथिल स्व.युवराज पाटील यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | **श्री.भंगाळे विष्णू रामदास** | १) डॉ.श्री. जितेंद्र चौधरी यांचे वडील कै.रामचंद्र पुरुषोत्तम चौधरी सर यांचे दु:खद निधनाबद्दल.<br>२) फोटोग्राफर श्री.अतुल वडनेरे व श्री.संजय वडनेरे यांचे वडील स्व.फतरुशेठ वडनेरे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | **प्रा.श्री.पाटील सचिन भिमराव** | १) श्री.चंद्रशेखर निकम यांच्या मातोश्री कै.ग.भा.ठगुबाई निकम, तसेच<br>२) अखिल भारतीय अहिर शिंपी समाज जिल्हा अध्यक्ष श्री.शिवाजी शिंपी यांच्या मातोश्री कै.ग.भा.देवकाबाई ओंकार शिंपी यांचे दु:खद निधनाबद्दल.<br>३) प्रभाग क्रं.७ मधिल रहिवासी सहकार महर्षी कै.आण्णासो बापूराव |

| | | |
|---|---|---|
| | | हिम्मतराव देशमुख यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ७. | श्री.पाटील राजेंद्र झिपरु | १) मेहरुण येथिल कै.दामू लक्ष्मण सानप तसेच<br>२) कै.गं.भा.शेवंताबाई रामदास इखे यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२४ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | **१. सौ.भोळे सिमा सुरेश<br>मा.महापौर<br>१.डॉ.श्री.सोनवणे अश्विन शांताराम,<br>मा.उपमहापौर** | १) जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन्मा.सदस्या सौ.लताताई चंद्रकांत सोनवणे यांची चोपडा विधानसभा मतदार संघातून आमदारपदी निवड झालेबद्दल हार्दीक अभिनंदन.<br>२) कन्या शाळेची विदयार्थीनी कु.दिशा पाटील हीने राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त करुन राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड झालेबद्दल. |
| २. | **१.डॉ.श्री.सोनवणे अश्विन शांताराम,<br>मा.उपमहापौर<br>श्री.बाविस्कर किशोर रमेश** | नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवर लिफ्टींग स्पर्धेत नगरसचिव विभागातील कर्मचारी श्री.प्रकाश गिरधर सपकाळे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले त्यांचे या कामगिरीमुळे त्यांची आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टींग स्पर्धेकरिता भारतीय संघात निवड झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ३. | **प्रा.श्री.पाटील सचिन भिमराव** | कन्या शाळेची विदयार्थीनी कु.दिशा पाटील हीने राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त करुन राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड झालेबद्दल. |
| ४. | **१. श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ<br>२. श्री.मराठे राजेंद्र नारायणराव** | राम जन्मभुमी संदर्भात हिंदु मुस्लिम प्रतिकेला धरुन निकाल दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे पाचही न्यायाधीशांचे हार्दीक अभिनंदन. |
| ५. | **श्री.कोल्हे ललित विजयराव** | मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी, मा.गृहमंत्री,श्री.अमितजी शाह यांनी नागरीकत्व दुरुस्ती विधेयक संसदेत पारित केल्याबद्दल. |
| ६. | **१.श्री.कोल्हे ललित विजयराव<br>२. श्री.भंगाळे विष्णू रामदास** | १) शिवसेना पक्ष प्रमुख मा.ना.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब यांची मुख्यमंत्री पदी, तसेच<br>२) मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांची गृहमंत्री पदी तसेच<br>३) मा.ना.श्री.जयंत पाटील साहेब यांची अर्थ मंत्री पदी,<br>४) मा.ना.श्री.बाळासाहेब थोरात साहेब यांची महसूल मंत्री पदी,<br>५) मा.ना.श्री.छगन भुजबळ साहेब यांची ग्रामीण विकास व जलसंपदा मंत्री पदी,<br>६) मा.ना.श्री.सुभाष देसाई साहेब यांची औदयोगीक व कृषीमंत्री पदी तसेच<br>७) मा.ना.श्री.नितीन राऊत साहेब यांची सार्वजनिक बांधकाम व महिला बालविकास मंत्री पदी,निवड झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ७. | **श्री.भंगाळे विष्णू रामदास** | १) शिवसेना पक्ष प्रमुख मा.ना.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब यांची महाविकास आघाडीकडुन मुख्यमंत्री पदी, तसेच<br>२) जाणता राजा, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष, मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, मा.श्रीमती सोनिया गांधी, राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष, अध्यक्ष, माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे सुध्दा हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ८. | **डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील** | प्रभाग क्रं.८ मधील गिरणाई कॉलनीतील रहिवाश्यांनी एकत्र येऊन संपूर्ण कॉलनी परिसरात सुरक्षितेसाठी अतिशय परिश्रम घेवून सी.सी.टि.व्ही. कॅमेरा स्वखर्चाने बसवुन घेतले याबद्दल गिरणाई कॉलनीतील संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रकाश इंगळे, उपाध्यक्ष, श्री.प्रकाश कोळी, पंजाबराव पाटील, रमेश सरदार, विजय पाटील, नंदकिशोर पाटील, डॉ.राहुल पाटील व गिरणाई बहुद्देशिय संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे हार्दीक अभिनंदन. |

**श्री. चंद्रशेखर पाटील :-** सन्मा.महापौर, गिरणा कॉलनीचे रहिवासी या ठिकाणी आलेले आहे. प्रभाग क्र.०८ मधील रहिवास्यांनी एकत्र येवुन स्वखर्चाने सि.सि.टीव्ही कॅमेरे बसविलेले आहे. आणि जळगांव शहरामध्ये प्रथमत: असा उपक्रम राबविलेला आहे. त्या कॉलनीतील रहिवासी, संस्थचे अध्यक्ष व पदाधिकारी श्री.प्रकाश इंगळे, उपाध्यक्ष श्री.प्रकाश कोळी, श्री.विजय पाटील, श्री. राजेंद्र पाटील व डॉ. अरुण पाटील या सर्व नागरीकांनी एकत्र येवुन हा उपक्रम राबविलेला आहे. मी सन्मा.महापौर व उपमहापौर यांनी विनंती करेल की, त्यांनी या नागरीकांचा त्यांच्या हस्ते सत्कार करावा.

| | | |
|---|---|---|
| ९. | **सौ.वानखेडे रंजना विजय** | १) विधानसभा निवडणुकीत मा.देवेंद्रजी फडणवीस यांचे नेतृत्वाखाली भा.ज.पा.ला घवघवीत यश मिळुन दिल्याबद्दल मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे तसेच<br>२) जळगांव जिल्हयातून सर्वाधीक मतांनी विजयी झालेले मा.आ.श्री.सुरेश दामू भोळे व मा.मंत्री गिरीषजी महाजन यांचे हार्दीक अभिनंदन. |
| १०. | १. **सौ.तायडे सुरेखा नितीन**<br>२. **सौ.राणे गायत्री इंद्रजित** | जळगांव शहर मतदार संघात सलग दोन वेळा आमदारपदी निवड झालेबद्दल मा.आ.श्री.सुरेश दामू भोळे यांचे हार्दीक अभिनंदन. |

**श्री.कैलास सोनवणे :-** आपल काय ठरल होत मागच्या वेळेस समजा श्री.गिरीष महाजन निवडुन आले. त्यांच १० लोकांनी अभिनंदन केल. तर एकाच वेळी त्यांचे नाव वाचुन घ्यावे.

**नगरसचिव :-** हो, त्याप्रमाणेच आहे.

**मा.उपमहापौर :-** हो, त्याप्रमाणेच त्यांनी तयार केलेले आहे.

सन्मा.सदस्य ईब्राहिम मुसा पटेल हे मा.महापौर यांचा राजदंड उचलुन पळाले व त्यांच्यासोबत श्री.रियाज अहेमद अब्दुल करीम बागवान हे होते. ते देश बचाव संविधान बचाव अशी घोषणा देत होते. श्री.ईब्राहिम पटेल राजदंड घेऊन त्यांचे आसनाजवळ घेऊन उभे राहिले व एनआरसीला पाठिंबा देणाऱ्यांचा धिक्कार असो अशी घोषणा देऊ लागले सदर प्रसंगी त्यांच्या पाठोपाठ भालदार श्री.छोटु न्हावी हे पळाले व राजदंड घेऊन जाणेस विरोध केला व सभागृहात गोंधळ निर्माण झाला. राजदंड श्री.ईब्राहिम पटेल यांचे आसनाजवळ त्यांच्या ताब्यात होता.

**श्री.रियाज बागवान :-** देश बचाव, संविधान बचाव.

**श्री.कैलास सोनवणे :-** घरी घेऊन जा, त्यांना घरी घेऊन जाऊ द्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** एन.आर.सी. लागु करणाऱ्यांचा धिक्कार असो. एन.आर.सी.लागु करणाऱ्यांचा धिक्कार असो.

- सन्मा.सदस्य श्री.ईब्राहीम पटेल व श्री.रियाज बागवान हे उपरोक्त प्रमाणे घोषणाबाजी करीत असताना सभागृहात प्रचंड गोंधळ उडाला व भा.ज.प.चे सदस्य श्री.विशाल त्रिपाठी, श्री.भगतराम बालाणी व इतर सदस्य हे सन्मा.सदस्य,श्री.ईब्राहीम पटेल यांचे आसना जवळ येवुन श्री.पटेल यांचे हातात असलेला राजदंड हिसकावणेचा बराचवेळ प्रयत्न केलेनंतर भा.ज.प.चे इतर सदस्यांनी मिळून श्री.पटेल यांचे हातातील राजदंड हिसकावुन आपल्या ताब्यात घेवुन भाजपा सदस्य वंदे मातरम व भारत माता की जय अशा घोषणा देत राजदंड मा.महापौर यांचे समोर आणून ठेवला. त्यानंतर सर्व भाजपा सदस्य एकाचवेळी सदस्य श्री.पटेल व श्री.बागवान यांना उद्देश बोलत होते त्यावेळेस प्रचंड कल्लोळ झाला व सदस्य कोणता सदस्य काय बोलत आहे ते सदर गोंधळामुळे समजत नव्हते. सदरवेळेस सभागृहात प्रचंड गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती त्याचवेळेस भाजपा सदस्यापैकी श्री.ललित कोल्हे सन्मा.सदस्य यांना उद्देशून म्हणाले की, ही काय पध्दत आहे कां ? त्यावेळेस सुध्दा भाजपा सदस्य हे

वंदेमातरम  वंदेमातरम अशा जोरदार घोषणा करीत होते व त्याचवेळेस सदस्य श्री.ईब्राहीम पटेल व श्री.रियाज बागवान हे बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा घोषणा देत होते. सभागृहात एकच गोंधळाची परिस्थिती सुरु होती. भा.ज.पा.सदस्य हे व्यासपिठावरुन खाली उतरु लागले त्यावेळेस सदस्य श्री.भगतराम बालाणी बोलू लागले की, जे नागरीक नाहीत ते सोडून तुम्ही कां चिंता करता असे म्हणत खाली उतरले. त्यानंतर शिवसेना सदस्य हे भाजपा सदस्यांशी बोलुन शांत राहण्याचे सांगत होते त्याचवेळेस इतर भाजपा सदस्य हे जोरात बोलत होते कोण काय बोलत होते ते समजत नव्हते त्याचवेळेस सदस्य श्री.विशाल त्रिपाठी हे सदस्य श्री.पटेल व श्री.बागवान यांची निलंबनाची मागणी करीत होते. त्याचवेळेस विरोधी पक्षनेता श्री.सुनिल महाजन व शिवसेना सदस्य श्री.नितीन लढ्ढा, श्री.विष्णू भंगाळे, श्री.प्रशांत नाईक, श्री.अमर जैन, आणि सभागृहनेता श्री.ललित कोल्हे हे मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेशी चर्चा करीत होते त्याचवेळेस सभागृहातील भाजपा सदस्य हे जोरदारपणे सदस्य श्री.पटेल व श्री.बागवान यांची निलंबन करणेत यावे अशी मागणी करीत होते व वंदेमातरम, भारत माता की जय अशा घोषणा देत भाजपा चे सर्व महिला सदस्या व सदस्य हे मा.महापौर यांचे व्यासपिठासमोरिल वेल मध्ये येवुन सदर घोषणा देत होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर तथा पिठासिन अधिकारी, या सदस्यांवर कारवाई करण्यात यावी.

**श्री.सुनिल खडके :-** मा.महापौर महोदया यांना अपात्र करणेत यावे. त्यांना सभागृहाबाहेर काढणेत यावे त्याशिवाय सभागृहाचे कामकाज सुरु होणार नाही.

**श्री.ज्योती चव्हाण :-** मा.महापौर यांना अपात्र करणेत यावे तद्नंतर सभागृहाचे कामकाज चालू करणेत येईल.

- सर्व भाजपा सदस्य अपात्रेची कारवाई करण्याची मागणी करीत होते त्यांना शिवसेना सदस्य हाताचे खुणेने नाही असे सांगत होते. त्याचवेळेस व्यासपिठावर सदस्य श्री.कैलास सोनवणे हे मा.महापौर महोदया व मा.उपमहापौर महोदय यांचेशी चर्चा करीत होते तद्नंतर त्यावेळेस सदस्य श्री.नितीन लढ्ढा, श्री.विष्णू भंगाळे, श्री.अमर जैन यांनी श्री.कैलास सोनवणे यांचेशी चर्चा केली तसेच त्याचवेळेस स्थायी समिती.सभापती,मा.सौ.शुचिता हाडा यासुध्दा मा.महापौर महोदया यांचेशी चर्चा करीत होत्या तद्नंतर सौ.हाडा यांचेशी श्री.लढ्ढा यांनी सुध्दा चर्चा केली. त्यानंतर श्री.लढ्ढा यांनी मा.उपमहापौर व मा.महापौर यांचेशी चर्चा केली त्याचवेळेस सभागृहातील भाजपा सदस्य हे वंदेमातरमच्या घोषणा देत होते. म.आयुक्त सो यांचेशी मा.उपमहापौर यांनी काही चर्चा केली.

**मा.महापौर :-** सर्वांनी खाली बसुन घ्यावे.

**मा.उपमहापौर :-** सदस्यांनी शांतता ठेवावी.

- सभागृहात गोंधळ सुरुच होता. सदस्य श्री.ईब्राहीम पटेल हे काही बोलत होते परंतू त्यांना सदस्य श्री.नितीन लढ्ढा व इतर सदस्य हे शांत करीत होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर मला बोलू दयावे, ईबाभाई आपण खाली बसून घ्यावे.

- सदस्य श्री.पटेल हे बोलू लागताच सर्व भाजपा सदस्य हे सुध्दा बोलू लागले व परत गोंधळामध्येच सदस्य श्री.सुनिल खडके व इतर सदस्य हे श्री.पटेल व बागवान यांना बाहेर काढणेची मागणी करुन लागले.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला बोलू तर दया. मा.महापौर, सन्मा.सदस्य, आज १९ डिसेंबर

**श्री.अश्विन सोनवणे, मा.उपमहापौर :-** दरवाज्याजवळ जी रिकाम्या लोकांची गर्दी जमलेली आहे ती अगोदर कमी करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर, मा.उपमहापौर, आज १९ डिसेंबर २०१९, आजच्याच तारखेला ईबाभाई ऐका, १९ डिसेंबर १९२७ रोजी अशपाक उल्ला खान फाशीवर गेले आज त्यांचे स्मरण होत आहे आणि काकोडी कटामध्ये जी लुट केली, त्यामध्ये इंग्रजांचा जो ऐवज लुटला तेंव्हा त्यांचे सोबत दहा पंधरा क्रांतीकारक सुध्दा होते. ज्या बिलावरुन हा गोंधळ झाला त्याबाबतीत आजतक वर ९ ते १० वाजून २२ मिनिटापर्यंत म्हणजे १ तास २२ मिनिटे अमित शहा यांनी याचा खुलासा केला आहे आणि तो सुध्दा प्रुफसह दिला आहे. या बिलाची सुरुवात म्हणजे जेंव्हा स्वत: ब्लॉस्ट झाला होता तेव्हा महात्मा गांधी, पंडीत नेहरु यांनी स्वत: पत्र पाठवलेली आहेत की तुम्ही तुमच्या देशातील अल्पसंख्यांक यांना सुरक्षित ठेवा आम्ही आमच्या देशातील अल्पसंख्यांक यांना सुरक्षित ठेवतो. यादेशामध्ये जे फाळणीच्या वेळेस अल्पसंख्यांक होते त्यांच्यामध्ये वाढ झालेली आहे त्यांना त्रास झालेला नाही परंतू बांगलादेशामध्ये...(मध्येच सदस्य बोलू लागले) मला बोलू

दया. ज्या बिलामुळे यासभागृहात गोंधळ झाला त्याबाबतीत महात्मा गांधी, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद, नेहरु त्यानंतर इंदिरा गांधी यांनी सुध्दा या बिलाची सुरुवात केलेली आहे परंतू त्यांनी याचा पाठपुरावा केलेला नाही. ६०-७० वर्ष सडू दिले. त्या देशातून जे हिंदू आले त्यांना ६०-७० वर्षे सडू दिले आणि त्यांनी काहीच केलं नाही. पाकीस्तानमध्ये २३ टक्के हिंदू होते ते आज ३.४ आहे तर बांगलादेशमध्ये ३० टक्केवरुन ७ टक्के आज हिंदूची संख्या आहे. हे हिंदू गेले कुठे ? एकतर त्यांना मारुन टाकले किंवा त्यांचे धर्मांतर केले. आणि तेथून जे हिंदू भारतात आले म्हणजे तेथे हिंदूची संख्या कमी झाली. जे लोक येथे आले ते हिंदू, शिख, ईसाई, ख्रिश्चन, पारशी त्या सगळया लोकांना अमितशहा यांनी नागरिकत्व दिले आहे. आणि याची सुरुवात गांधी इ.यांनी केलेली आहे आणि या सगळया गोष्टी घडल्या आणि हे बिल मुस्लिमांचे विरोधातील नाही, जे भारतातले आहे आणि ते भारतातले सच्चे नागरिक आहेत व भारतावर प्रेम करणारे मुस्लिम भारताचेच आहेत आणि बांधव आहेत. परंतू ज्या बांग्लादेश घुसखोरांसाठी जे हरामखोर दांगडो करीत असतील ते गद्दार आहेत. (भा.ज.पा.सदस्यांनी याबाबत बाके वाजवुन स्वागत केले व भारत माता की जय अशी घोषणा दिली) त्यामुळे माझी विनंती आहे की, ईबाभाई व बागवान यांनी चुकीच्या माहितीतून जो गोंधळ घातला तो लांच्छनास्पद आहे मी सभागृहाला मागणी करतो की, त्यांचेवर कारवाई व्हायला पाहीजे.

सदस्य श्री.बालाणी व भाजपा इतर सदस्यांनी कारवाईची मागणी केली.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आतापर्यंत किती लोकांवर अशी कारवाई झाली ?

यानंतर परत गोंधळ निर्माण झाला त्याचवेळेस

**मा.महापौर :-** तुम्ही दोंघ सदस्यांनी आधी सभागृहा बाहेर जावे नाहीतर तुमचेवर निलंबनाची कारवाई करणेत येईल.

- सदस्य श्री.ईब्राहीम पटेल हे वेलमध्ये येवुन खाली बसले त्यांना सदस्य श्री.कैलास सोनवणे व इतर सदस्यांनी त्याठिकाणावरुन हात धरुन उठवले यावेळेस शिवसेना सदस्य व भाजपा सदस्यांमध्ये बराच गोंधळ झाला. त्यावेळेस भाजपा व शिवसेना सदस्यांनी सदस्य श्री.पटेल व श्री.बागवान यांना मा.महापौर यांचेशी चर्चा करणेचे सांगीतले व तद्नंतर श्री.पटेल व श्री.बागवान हे मा.महापौर यांचेशी चर्चा करणेसाठी व्यासपिठावर गेले व मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेशी चर्चा करु लागले त्यावेळेस सदस्य श्री.लढ्ढा, श्री.कैलास सोनवणे उपस्थित होते व त्याठिकाणी सदस्य श्री.कैलास सोनवणे यांनी मा.महापौर यांना १० मिनिटांसाठी सभा तहकूब करणेची विनंती केली.

**मा.महापौर :-** सदर सभे करीता दोघांना निलंबित करीत असून दहा मिनिटांकरिता सभा तहकूब करणेत येत आहे.

**सदर सभा तहकुब केल्यानंतर सन्मा.सदस्य .श्री.ईब्राहीम पटेल व रियाज बागवान हे सभागृहातुन निघुन गेले.**

**श्री.नितीन बरडे :-** मागील रिकामे लोक बाहेर काढा आणि कर्मचाऱ्यांना सुध्दा शांत राहणेस सांगावे.

**मा.महापौर :-** नगरसचिव तहकुब सभा सुरु करण्यात यावी.

**तहकुब सभेनंतर सन्मा.सदस्य .श्री.ईब्राहीम पटेल व रियाज बागवान हे सभागृहात उपस्थित नव्हते .**

**श्री.कैलास सोनवणे :-** या ठिकाणी एक निषेधचा ठराव मांडायचा आहे राहुल गांधी संदर्भात, राहुल गांधींनी जे वर्तव्य केल सावरकरांबद्दल, मोदीजींचे शब्द होते मेक इन इंडिया त्या शब्दांचा त्यांनी विपर्यास करुन त्यांनी नविन शब्दांना जन्म दिला रेप इन इंडिया आणि त्यानंतर संसदेमध्ये जो गोंधळ झाला. काही संसद सदस्यांनी त्यांना माफीची मागणीपण केली पण राहुल गांधींनी सांगितले की, मैं माफी मांगुगा नही, मैं सावरकर नही गांधी हु गांधी. ॲक्च्युली इतिहास वेगळाच आहे. ते गांधीपण नाही. सावरकर जेव्हा तुरुंगात होते पोर्ट ब्लियरच्या, त्यांना ५१ वर्षाची शिक्षा करण्यात आलेली होती. आणि त्यामध्ये ही ते इंग्रजांच्या सोबत नव्हते त्यांच्या विरोधात होते. त्यांना वेगवेगळया प्रकारच्या अन्य शिक्षा झालेल्या आहे. चार महिन्याचा कारगृह प्रवास, काही लेटर सापडल म्हणुन नंतर कोलुला वळुन तेल काढायच असत. म्हणजे एका दिवसाला १६-१६ किलो तेल काढणे ते सगळे दंडाबेळी घालुन सर्व वजनदार, त्यांना चार चार महिने ठेवल जायच जेलमध्ये आणि ती जेल, स्वातंत्रापुर्वीची जेल आणि स्वातंत्राच्या नंतरच्या जेली, आता जवळ जवळ ६० नगरसेवक व नगरसेविका, आपल्या माता बहिणी ४० दिवस जेल मध्ये होत्या त्यांनी पाहिल की काय यातना होतात. स्वातंत्र भारतात. तुम्ही विचार करा, सावरकरांनी काय यातना भोगली असेल. जेलर त्यांना बोलला की ५१ वर्षाची शिक्षा झालेनंतर, सावरकर तुम जिंदा रहोंगे क्या, सावरकरांनी सांगितले तुम्हारा सरकार रहेंगा क्या. सावरकरांच म्हणण खरं ठरल, सावरकर बाहेर आले आणि

इंग्रजांच सरकार गेल. तब्बल १३ वर्ष त्यांनी जेल मध्ये काढलेले आहे. स्वातंत्र्य सैनिक कोणीही असो, क्रांतीवीर कोणीही असो. महात्मा गांधी, नेहरु कोणीही असो किंवा सरदार वल्लभभाई पटेल असो. राजेंद्र प्रसाद असतील आपल्या जळगांवचे काही स्वातंत्र सैनिक आहे. सगळयांचा सन्मान झाला पाहिजे. त्यांच योगदान आहे. या राष्ट्र उभारण्यासाठी. तर त्यांना असे बोलता कामा नये. तुमचे विचार वेगळे असेल परंतु तुम्ही त्यांच योगदान नाकारणार आहेत का ? म्हणजे स्वत: इंग्रेजांनी त्यांचा जन्मशताब्दी दिनी तिकीट काढलेल आहे आणि त्यांचा गौरव केलेला आहे. स्वत: महात्मा गांधींनी यंग इंडिया साप्ताहीकात महात्मा गांधींनी त्यांच नाव इंदिरा गांधींना दिल आणि त्यांचे वारसाना हे नांव आल त्यांच्यात परंतु गुण नाही आले त्यांच्यात. कारण इंदिरा गांधी ही १००% भारतीय होती. म्हणुन तीने सावरकरांचा गौरव केलेला आहे. जेव्हा यांचा जन्म झाला तेव्हा हे इटलीत होते यांच्यावरती संस्कारच झालेले नाही. अस म्हटल जात संस्कारांच्या बाबतीत मध्ये जिजामाताने जे संस्कार दिले शिवाजी महाराजांवरती, शहाजी राजे सवारींवरती जायचे धाकाधुकीचा काळ होता तो. आणि शिवाजी महाराज घडविले आणि संभाजी महाराज ही घडविले. यांच्यावर काय संस्कार झाले, विदेशी संस्काराचा अंश राहुल गांधींमध्ये आहे त्यांची लायकी नाही सावरकरांबद्दल बोलण्याची म्हणुन त्यांनी फक्त गांधी नाव घेतल पण संस्कार घेतले नाही इंदिरा गांधी कडुन राजीव गांधीकडुन, राजीव गांधीही तसेच जात होते. म्हणुन यांच्यावर जे संस्कार झालेले आहे ते इटली मध्ये झालेले आहे. हे सगळ बोलुन मी या ठिकाणी त्यांचा निषेधाचा ठराव मांडतो.

**श्री.चेतन सनकत :-** राहुल गांधी यांचा निषेध असो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माफी मांगो, माफी मांगो, राहुल गांधी माफी मांगो

(सर्व भाजपा सदस्य यांनी राहुल गांधी माफी मांगो अशा घोषणा दिल्या)

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया, काही अभिनंदनाचे प्रस्ताव वाचन करण्याचे राहीले आहे त्याचे मी वाचन करतो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२४ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| | | |
|---|---|---|
| ११. | **१. सौ.तायडे सुरेखा नितीन**<br>**२. सौ.राणे गायत्री इंद्रजित** | जळगांव शहर मतदार संघात सलग दोन वेळा आमदारपदी निवड झालेबद्दल मा.आ.श्री.सुरेश दामू भोळे यांचे हार्दीक अभिनंदन. |
| १२. | **श्री.लढढा नितीन बालमुकुंद**<br>**श्री.बरडे नितीन मनोहर**<br>**श्री.जोशी अनंत हरिश्चंद्र**<br>**श्री.नाईक प्रशांत सुरेश**<br>**श्री.पटेल इब्राहिम मुसा**<br>**श्री.चौधरी मनोज सुरेश**<br>**श्री.सोनवणे विक्रम किसन**<br>**श्री.भंगाळे विष्णु रामदास**<br>**श्रीमती सोनवणे राखीताई शामकांत**<br>**श्रीमती तायडे ज्योती शरद**<br>**श्रीमती महाजन जयश्री सुनिल**<br>**श्रीमती शेख शबानाबी सादीक**<br>**श्री.जैन भागचंद मोतीलाल**<br>**श्रीमती भापसे जिजाबाई अण्णासाहेब**<br>**श्री.महाजन सुनिल सुपडू,**<br>**मा.विरोधी पक्षनेता** | महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी मा.श्री.उध्दवजी ठाकरे यांची निवड झाल्याने व शिवसेना मार्फत मंत्री मंडळाचा व खाते वाटपाचा विस्तार झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपले टाऊन प्लॅनर श्री.धामणे साहेब ३१ डिसेंबरला रिटायर होत आहे. त्यांनी प्रशासनात राहुन चांगल काम केल. म्हणुन मी सभागृहाच्या वतीने त्यांच धन्यवाद व अभिनंदन करतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** धामणे साहेबांचे अभिनंदनाचे बाबतीत प्रस्ताव आहे. मा.धामणे साहेबांनी जवळ जवळ साडेतीन वर्षाचा कार्यकाळ त्यांनी आपल्या महानगरपालिकेत काढलेला आहे. मागील काळामध्ये सुध्दा २ वर्ष होते. आता दिड वर्ष सहाय्यक संचालक नगररचनाकार म्हणुन त्यांनी आपल्या नगरपालिकेला कार्यकाळ दिलेला आहे. त्यांच व्यक्तीमत्व कामाच्या बाबतीत ही चांगल होत. त्यांनी नोकरी दि.१८/१०/१९९४ नगररचना विभागात रचना सहाय्यक पदावर रुजु झाले आणि दि.०१/०१/२००३ रोजी महाराष्ट्र लोक सेवा आयोगामार्फत (MPSC) नगररचनाकार, वर्ग-१ पदावर नियुक्ती झाली, धुळे महानगरपालिका चार वर्ष, मालेगांव महानगरपालिका अडीच वर्ष जळगांव मनपा सांगितल्या प्रमाणे सन २०११ व २०१२ दोन वर्ष व आता दि.०१/०६/२०१८ पासुन कार्यरत आहे. वडीलांचा परिचय कै.त्र्यंबक विष्णु धामणे सामाजिक कार्यकर्ते होते. भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९५४ मध्ये त्यांच चाळीसगांव येथे दलित मित्र म्हणुन सत्कार केला आहे. कौटुंबिक परिचय, त्यांना दोन मुल आहे. एक एम.डी.मेडीसीन आहे. एकानी एम.एस. इंजिनिअरींग लंडन मध्ये केलेल आहे. त्यांच्या छंदा करीता त्यांची ग्रिनिज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्ड मध्ये ही नोंद झालेली आहे. आपण जर अनुभव घेतला तर मागील काळात आपल्याकडे नगररचनाकार खुप गाजलेले आहे. पण नक्कीच धामणे साहेबांच्या काळामध्ये चांगले काम होत असतांना चांगले काम करण्याच्या माध्यमातुन पध्दत त्यांचा काळातुन झाली. शिवसेना आणि सभागृहातर्फे ते दि.३१ डिसेंबरला रिटायर होत आहे तर त्यांना भावी पुढील काळासाठी शुभेच्छा देतो आणि थांबतो धन्यवाद.

**श्री.नितीन लढढा :-** श्री.धामणे साहेबांच मी ही अभिनंदन करतो आणि आता त्यांचे १० दिवस उरलेले आहे. मला वाटत सेवानिवृत्तीच्या पुर्वी महानगरपालिकेमध्ये असलेली सर्व नगररचनाची प्रकरण त्यांनी मार्गी लावुन सेवानिवृत्ती घ्यावी. अशी आमची सुचना व विनंती आहे. कारण काय आहे. यांच्या सेवानिवृत्तीनंतर नवीन अधिकाऱ्याच्या नियुक्ती मध्ये बराच काही विलंब लागु शकतो. कारण अश्या परिस्थिती मध्ये बऱ्याच नागरीकांना विकास परवानगी म्हणा, टि.डी.आर.म्हणा, जी काही प्रलंबीत प्रकरण असतील त्याच्यासाठी ताटकळत उभ राहव लागेल. म्हणुन धामणे साहेब आपल्याला विनंती आहे आणि आपल्याला मनापासुन शुभेच्छा ही आहे की आपण आमच्या विनंतीचा मान ठेवुन ३१ तारखेच्या पुर्वी नगररचना विभागात एकही फाईल प्रलंबीत राहणार नाही याची आपण दक्षता घ्याल ही विनंती.

**नगरसचिव :-** या ठिकाणी गिरणा कॉलनीचे नागरीक आलेले आहे त्यांचा सत्कार करावा.

मा.महापौर यांनी गिरणा कॉलनीचे नागरीक व संस्थेचे पदाधिकारी यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. याप्रसंगी व्यासपिठावर मा.सभापती,स्थायी समिती,सौ.शुचिता हाडा, मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल महाजन, मा.सभागृहनेता,श्री.ललित कोल्हे, मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती, शोभा बारी, तसेच गटनेता भाजपा श्री.भगतराम बालाणी, सन्मा.सदस्य, श्री.चंद्रशेखर पाटील, सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा सुधिर पाटील उपस्थित होते.

**मा.महापौर :-** मा.सभागृह, आपल्या सर्व महिलांसाठी संदेश आहे, आपल्या दैनिक दिव्य मराठी तर्फे एक नाईट वॉक शो हा एक चांगला उपक्रम महिलांसाठी राबविला आहे तरी आपण सर्व महिलांनी त्यांचे या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे. तरी आपल्या भगीनींचे स्वसंरक्षण कसे करता येईल याचा यातून संदेश मिळणार आहे. रवीवारी रात्री रॅली शिवतिर्थ ते काव्य रत्नावली चौक पर्यंत निघणार आहे तरी सर्वांना विनंती करते की आपण सर्वांनी हजर राहायचे आहे. श्री.धामणे साहेब यांना दोन शब्द बोलायचे आहे त्यांना मी परवानगी देत आहे.

**श्री.धामणे,नगररचनाकार :-** मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त साहेब व या सभागृहाचे माननीय सदस्य, तसे मी या महानगरपालिकेत दुसऱ्यांदा आलो. मी पहिल्यांदा धुळे महानगरपालिकेत काम करताना माझे जवळचे मित्र आणि गुरुसमान कै.दिलीप पायगुळे साहेब यांचा मी आदर्श घेण्याचा प्रयत्न केला होता. माझा स्वभाव अतिशय सरळ आहे जर काम होत असेल, नसेल तर तोंडावर सांगतो त्यामुळे सन्मा.सदस्यांना जर मी नाही सांगीतले असेल व काम झाले नसेल सन्मा.सदस्यांना त्याचा राग आला असेल तर मी त्यांची माफी मागतो. आणि सर्वच सदस्यांनी मला प्रेम दिलेले आहे. मी जरी निवृत्त होत असलो तरी आपण मला केंव्हाही फोन करा मी माझे परीने काम करीन. या महापालिकेत काम करीत असताना मी एक-एक रुपयांचा, पैश्यांचा हिशोब करुन महानगरपालिकेचा फायदा कसा होईल याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे मी अनेक रेफरन्स करुन तुम्हाला माहित आहे, २४ कोटी वरुन १२ कोटीवर अवॉर्ड आलेले आहेत. त्यावेळेला

पुष्कळ प्रेशर आले परंतू मी कुठल्याही प्रेशरला कधीही घाबरत नाही, घाबरणार नाही, मला यासभागृहाने प्रेम दिले, सर्वांनी माझे अभिनंदन केले त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**म.आयुक्त :-** मा.महापौर, उपमहापौर, सर्व सभागृह मी प्रशासनाचे वतीने आपल्या शहरातील स्वच्छतेच्या संदर्भात जे वॉटरग्रेस कंपनीला आपण जो ठेका दिलेला आहे त्यासंदर्भात एक निवेदन संक्षितपणे करणार आहे. वॉटर ग्रेस कंपनीच्या कामा बाबत सर्व पदाधिकारी, नगरसेवक, प्रशासनातील अधिकाऱ्यांनी यांच कुठलही समाधानकारक काम नाही असे मत आहे. या संदर्भात त्या कंत्राटदाराच्या ज्या काही चुका आहेत त्यासंदर्भात त्यांचेवर वेळोवेळी कारवाई केलेली आहे. आता येत्या काही दिवसांमध्ये त्या कंत्राटदारांना अंतिम नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे आणि त्यासंबंधीची कारवाईचा अहवाल पुढच्या जानेवारी महिन्याच्या सभेत ठेवणार आहे. मग त्या कालावधीमध्ये पर्यायी व्यवस्था करुन ४ प्रभागांमध्ये काय मॅनपॉवर उपलब्ध करुन दयायची आहे ती येत्या ७ दिवसांत आम्ही करु. धन्यवाद.

**मा.उपमहापौर :-** नगरसचिव यांनी विषयांना सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** विषय पत्रिकेवरिल विषयांना सुरुवात करणेत येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १) दि.१५/११/२०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.**

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** यासंदर्भात काही चर्चा करायची आहे, पिंप्राळा घरकुल, मागील महासभेत एक समिती गठीत केली होती. उपायुक्त यांची समिती त्या समितीचा काय अहवाल आला ? याचा पाठपुरावा केला कां ? ७६ घरकुल वाटपा संदर्भात एक समिती गठीत केली होती ती समिती गठीत झाली कां ? ही प्रशासकीय समिती होती. त्याचा अहवाल, काय, कसे वाटप करणार आहे ?

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** महापौरताई मागच्या महासभेत जस बोलण झालेल होत. उपायुक्त साहेब यांचे अध्यक्षते खाली समिती गठीत केलेली आहे. त्यामध्ये लकीड्रॉ पध्दतीने घरकुल वाटप करणार आहे. समिती गठीत झालेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किती दिवसात करणार. ७६ घरकुले बांधकाम केलेले आहे. तेथे परत अतिक्रमण होत आहे. अंध आणि अपंग लोकांसाठी मागे मा.आमदार श्री.राजुमामा भोळे यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता. काही घरकुल त्या लोकांना वाटप करण्याचे आदेशीत करण्यात आलेले होते. पण तिथे अशी परिस्थिती आहे. काही ठिकाणी खिडक्या नाही काही ठिकाणी दरवाजे नाहीत. मागे रिपेअरींगच काही टेंडर काढल होत आपण. त्या ठिकाणी काही लोकं परत सामान टाकतात अतिक्रमणाचा, त्यांची दक्षता कोण घेणार. त्या ठिकाणी वॉचमन नाही.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** महापौरताई, सन्मा.सदस्यांनी आता जो विषय मांडला आहे ७६ घरांचा विषय नाही. जे आपण पुर्वीचे घरे बांधलेले आहे जे सन १९९९ मध्ये घरकुल बांधलेले आहे. त्यात काही लोक घुसलेले आहे. आता जे काम सुरु केलेले आहे त्यात सर्व संरक्षण घेऊन काम सुरु करण्यात आलेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लवकरात लवकर करा, कारण ते अंध अपंग लोकांनाही घरे मिळायला पाहिजे. ईतिवृत्त मंजुर करण्यात याव.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, **दि.१५/११/२०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस** मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ६१** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:- श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ** | |
| **अनुमोदक** | **:- श्री. सनकत चेतन गणेश** | |

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** विदयुत विभागाकरिता खरेदी करण्यात आलेल्या TATA ४०७ चेचीसवर ११ मीटर उंचीचे B00m Type Ladder व TATA ७०९ चेसीसवर १५ मिटर उंचीचे Telescopic Type Ladder **बांधणी करणे कामी** रक्कम रु.३२,०९,३२०/- अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. मात्र प्रशासनाला सुचना आहे की याची मुदत मार्चला संपत आहे. तर प्रशासनाची ही जबाबदारी राहणार आहे की, मुदतीत हे काम पुर्ण करुन घ्यायच आहे. हे प्रशासनाला बंधनकारक असणार. आणि ही जबाबदारी प्रशासनाची असणार याची नोंद घ्यावी.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य विभाग :-** मा.महापौर, मा.आयुक्त व मा.सभापती याच विषयाच्या संदर्भात सखोल निर्णय आम्हाला या संदर्भात घ्यायचा आहे. आम्ही हे विषय ऑक्टोबर महिन्यात महासभेत सादर केल्यानंतर ही पहिली सभा होत आहे. तदनंतर पुर्वीची जी निविदा काढली होती. ठेकेदार या कामाची तयारी दाखविणेस असमर्थ ठरले. किती तरी वाहने आहे जी आपल्या महानगरपालिकेत आलेली आहे परंतु रजिष्ट्रेशन न झाल्यामुळे त्यांची चेचीस बांधणी नाही. आणि त्याच रजिष्ट्रेशन अद्याप बाकी आहे. हे सर्व वाहनाची रजिष्ट्रेशन ३१ मार्च पर्यंत होणे गरजेचे आहे. पुर्वीची जी महासभेची मान्यता होती ती ९ मिटर आणि ११ मिटरसाठी होती. परंतु या निमित्त त्या विभागाचे अभिप्राय घेतल्यानंतर ११ मिटर आणि १५ मिटरची मागणी केलेली आहे. त्यानुसार पुर्वीचे जे टेंडर आहे. त्याचे ठेकेदार काम करणेस तयार आहे. त्याप्रमाणे आम्ही योग्य अभिप्राय घेऊन त्यादृष्टीने त्याच ठेकेदारास जर ते देता आले तर ते देऊ कारण नविन प्रक्रिया करुन काहीसा विलंब होण्यापेक्षा या पध्दतीने काम करणे आम्हाला सोईचे होईल जेणे करुन कामाला व रजिष्ट्रेशनाला विलंब होणार नाही. म्हणुन जुन्या ठेकेदाराला काम देणे व रु.३२ लाख खर्चाला प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई आता दंडवते साहेबांनी जो प्रश्न केला. वास्तविक म्हटल तर पहिल्यांदाच चुक झालेली आहे. साधारणता रु.२१, १५,७००/- रुपयाच्या खर्चास त्यावेळेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. आणि त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. परंतु प्रशासनाने नव्याने कुठलीही प्रशासकीय मान्यता न घेता Specification बदलले आणि Specification बदलुन निविदा प्रक्रिया राबविली. आणि ती निविदा प्रक्रिया जी राबविलेली आहे त्याच्यामध्ये जे दर आलेले आहे. त्याला सुध्दा मान्यता देण्याच्या संदर्भात प्रशासनाची भुमिका आहे. मला कुठेतरी नियमांची पायमल्ली आणि नियमांचे उल्लंघन होतांना दिसत आहे. ज्या पध्दतीने एक प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असता, त्याच्या Specification मध्ये बदल करण्याचा अधिकार नाही. ती चुक झाली त्याच्यासाठी प्रशासकीय मान्यता घेण्याच्या अनुषंगाने दि.२९/०८/२०१९ रोजी महासभेकडुन फक्त प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. त्यावेळेस महासभेने ठराव केला होता. ठराव क्र.११९ दि.२९/०८/२०१९ अन्वये सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला तसेच नव्याने निविदा प्रक्रिया करणेस सदर विभागास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. म्हणजे आता आपल्याला फक्त ३२ लक्ष रूपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देता येईल.निविदा प्रक्रीयेला भलेही विलंब लागत असेल ३१ मार्च होण्यापुर्वी तिच रजिष्ट्रेशन करण क्रमप्राप्त आहे. परंतु गेल्या ४ महिन्यांचा हा विलंब झालेला आहे .आणि या विलंबामुळे अशा परिस्थितीतीला प्रत्येक वेळा आपल्याला सामोरे जावे लागते आहे.आणि फायर फायटर च्या बाबतीतली भुमिका आपण मागच्या सभेमध्ये अनुभवली आणि ईथेही तिच परिस्थिती आहे. म्हणजे एखादी चुक झाली तर त्याच्यावर पांघरूण टाकण्यासाठी आपण पुन्हा एक चुक करायची . ज्या ठेकेदाराला ३२ लक्ष रूपयांची निविदा पुर्वलक्षी प्रभावाने आपण याला प्रशासकीय मान्यता देवु शकतो .यासंदर्भात आयुक्त साहेब व वाहुळे साहेब यांनी जो खुलासा केला सभागृहाला तर याच्या बाबतीतला निर्णय आजचं घेणे संयुक्तीक होईल .अन्यथा शॉर्ट टेंडर मागवुन घ्या.शॉर्ट टेंडर मागवुन याच्यामध्ये कुठेतरी या संबंधातील लॅक्युना यायला नको आणि म्हणजे भविष्यात ऑडीट ऑब्जेक्शन निर्माण व्हायला नको .आणि यासंदर्भात सभागृहाला वाहुळे साहेब पुढील भुमिका स्पष्ट करतील तर बर होईल.

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** .आदरणीय सभागृह याविषयाच्या संदर्भात ही जी निविदा प्रक्रीया पार पाडण्यात आली होती .त्या निविदा प्रक्रीयेच्या नुसार आपल्याला ११ मीटर आणि १५ मीटर या दोन मोजमापाचे हे केलेले आहेत. टेक्नीकल स्पेसीफीकेशन जर आपल्याला तेथे हवेत तर त्यामध्ये ते आपल्याला दिलेले आहेत.अग्निशमन विभाग आणि वाहन विभाग या दोन्ही विभागांनी हे दिलेले आहेत की यात हे स्पेसिफीकेशन पाहीजेत. आणि प्रशासनाने जर नविन प्रक्रीया केली तर हे वाहने कालबाहय होईल आणि या मध्ये अधिकचे दर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर आज रोजी जे दर आहे ते स्विकारायला हरकत नाही. असे माझे मत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आपण ही चर्चा जर डॉकेट पाठवितांना व्यक्त केली असती तर हे प्रश्नच उपस्थित झाला नसता.

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** .आदणीय सभागृह या विषयाच्या संदर्भात मी हे मत नमुद केलेल होत की, या विषयाला मान्यता सभागृहाने दिलेली आहे महासभेने दिलेली आहे. त्यात Specification चेंजचा जो विषय आहे महासभा समोर येणे गरजेचे आहे. त्याच्या दरामध्ये होणारा बदल आणि Specification मध्ये होणारा बदल, त्यांनी सांगितल की, ऑगस्ट महिन्यामध्ये हे डॉकेट सभागृहामध्ये ठेवलेल होत. त्यानुसार जर तो सप्लायर दर द्यायला तयार असेल ज्या पैकीची Specification महानगरपालिकेला अपेक्षित आहे. तरी मंजुर करायला हरकत नाही असे माझे मत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आपल म्हणण काय आहे. पुर्वीच्या दरात मक्तेदार काम करायला तयार आहे. म्हणुन आपण ही भुमिका स्विकारत आहे. आज संपुर्ण जगात जागतिक मंदी आहे. आपण हे विचार करत आहे की जास्तीचे दर आले तर काय होईल.

परंतु कदाचित दर कमी ही येऊ शकतात. कुठेतरी हे संपुर्ण मंजुऱ्या घेतल्यानंतर Specification बदलण हे चुकीचे आहे. ही चुक जेव्हा लक्षात आली असेल त्यावेळेला चुक Rectify करण्याच्या दृष्टीकोणातुन नविन विषयाच्या खर्चास मान्यता देऊन नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे कायदेशीर रित्या संयुक्तीक होईल. नाहीतर हे चुकीच पडेल. मान्यता एका अमाऊंटला द्यायची नंतर Specification बदलुन नंतर निविदा मागवायच्या तो भाग वेगळा होत आहे.मला वाटत कुठेतरी विचार करायला पाहिजे प्रशासनाने साधारणता ३ महिन्याचा कालावधी आहे. शॉर्ट निविदा जर आठ दिवसाच्या मागविल्या. मक्तेदार तयार आहे याच्यापेक्षा अजुन कमी दरात करायला कोणी मक्तेदार समोर यायला तयार असेल.तर निश्चितपणे महानगरपालिकेचा यात फायदा होईल.नाही कोणी मक्तेदार आला तर हा मक्तेदार आहेच याने स्वत: पत्र दिलेलं आहे याबाबतीत विचार करायला पाहीजे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर आणि सन्मा.सभागृह माझ्याकडे जो विषय आला होता हा प्रशासकीय मान्यतेसोबत टेंडर मंजुरीसाठी आला होता. आता ॲडिटरने जे पॉईंटआऊट केले की, प्रशासकीय मान्यता व्यतिरिक्त प्रसिध्दी केली. याच्या संदर्भात शहर अभियंताचा खुलासा सुध्दा मागविण्यात आलेला होता. त्यांच म्हणण होत की, तत्कालीन आयुक्तांच्या पुर्वीसुचनेनुसार आम्ही प्रतिक्रिया देऊ. आज विषय असा आहे की, विशिष्ट स्वरुपाच काम आहे याच्यासाठी एजन्सी खुप मोठया प्रमाणावर नाही. जर आपल्याला आर्थिक बोजा पडणार नसेल. बऱ्याच वेळी अस असत की, टेंडरच्या दराची व्यालिडीटी १८० दिवस असते. जर तो सप्लायर तयार असेल तर मला वाटत की करणेस योग्य आहे. त्रुटी आहे बरोबर आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हे आपण वेळेची बचत आणि कालमर्यादा दिलेली आहे परंतु अश्यापध्दतीने भविष्यामध्ये त्रुटी राहु नये. ज्याच्यामुळे काल उपयोगी होत. कुठेतरी अश्या विषयात ताशेरे सुध्दा ओढले जाऊ शकता. तेवढी काळजी भविष्यात घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं.८६२ दि.२०/०२/२०१८ अन्वये TATA LPT ४०७ चेचीस -१ नग व TATA LPT ७०९ चेसीस -१ नग DGS&D (Rate Contract) शासन दरकरारात खरेदी करुन त्या चेसींस वर ९ मीटर व १२ मीटर उंचीचे Ariel Type हायड्रोलिक लॅडरची बांधणी करण्यास व याकामी चेसीस करीता रक्कम रु.२०,५०,४८२.४४ व लॅडर बांधणी करीता रक्कम रु.२१,२०,७५९.०० या प्रमाणे एकूण रक्कम रु.४१,७१,२४१.०० मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

DGS&D (Rate Contract) शासन दरकरारात चेसीसची खरेदी करण्यात आलेली आहे. तद्नंतर वाहन विभागामार्फत ९ मीटर व १२ मीटर उंचीचे Ladder ऐवजी ११ व १५ मीटर उंचीचे (Ariel व Telescopic) Ladder बांधणी करावयाच्या तांत्रिक स्पेसिफिकेशनचा अंतर्भाव करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या प्राप्त निविदा नुसार लॅडर बांधणीकामी एकूण रक्कम रु.३२,०९,३२०/- मात्र दराच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या निविदा प्रसिध्द करतांना मंजुर Technical Specification मध्ये बदल करतांना वाहन विभागामार्फत सक्षम प्राधिकरणांची मान्यता घेण्यात आली नसल्याने शहर अभियंता व मुख्य लेखापरिक्षक यांनी प्रथमत: महासभेची प्रशासकीय मान्यता घेण्याची शिफारस केली. केलेला तांत्रिक बदल व त्याकरिता येणारा अपेक्षित खर्च रक्कम रु. ३२,०९,३२०/- मात्रला प्रशासकीय मान्यता मिळणे कामी महासभेकडे प्रस्ताव ठेवण्यात आला असता महासभा ठराव क्रं.१९९ दि.२९/०८/२०१९ अन्वये सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला तसेच नव्याने निविदा प्रक्रिया करणेस संदर्भिय ठरावा अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

पुर्वी मिळालेल्या मान्यतेनुसार ९ मीटर व १२ मीटर उंचीचे लॅडरच्या बांधणीचे काम करावे अथवा ११ मीटर व १५ मीटर उंचीचे लॅडर बांधणीचे काम करावे या बाबत ठरावात काहीही नमुद नसल्याने वाहन विभागांमार्फत प्रकरणी विदयुत विभागाचा व अग्निशमण विभागाचा अभिप्राय घेण्यात येऊन ११ मीटर Ariel Type व १५ मीटर Telescopic Type Ladder बांधणीचे काम करण्यास व त्या वाहन विभागा मार्फत मागविण्यात आलेल्या निविदानुसार अपेक्षित आलेली रक्कम रु. ३२,०९,३२०/- मात्र चे खर्चास अंदाजपत्रकीय प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने TATA ४०७ चेचीसवर ११ मीटर उंचीचे B00m Type Ladder व TATA ७०९ चेसीसवर १५ मिटर उंचीचे Telescopic Type Ladder बांधणी करणे, वाहनांचे रजिस्ट्रेशन करणे इत्यादी बाबतची संपूर्ण प्रक्रिया दि.३१ मार्च २०२० पूर्वी विहीत मुदतीत पूर्ण करुन याबाबत नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- अड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- श्री.ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** पाणी पुरवठा विभाग झोन क्रं.११ अंतर्गत वार्ड क्रं.३३ मध्ये केलेल्या कामाचे देयक रक्कम रु.४३,८८०/- व वार्ड क्रं.०८ मध्ये केलेल्या कामाचे देयक रक्कम रु.४७,९३३/- मात्र मक्तेदारास अदायगी करणे व करारनामा करुन घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.भगत बालाणी :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, १) झोन क्रं.११ वार्ड क्रं.३३ जुना नशिराबाद नाका झोपडपट्टी मध्ये श्रावण बाबा भगत यांचे घरापासुन गुरांचे पाण्याच्या हाळापर्यत ९० मीमी पीव्हीसी पाईपलाईन टाकणे व २) झोन क्रं. ११ वा.क्रं.८ जळगांव स.नं. ११८/९/१ व ११८/९/२ योगेश्वर नगर नं.२ गल्लीमध्ये ११० मीमी पीव्हीसी पाईपलाईन व आजु बाजुच्या तीन गल्ल्याच्या पाईपलाईन मुख्य जलवाहिनीवर जोडणे कामी दोन कामांचे कररानामा करुन देयक अदा होणेस मक्तेदार श्री.गजानन झोपे यांनी दि. २२/०५/२०१९ रोजी अर्ज दिलेला आहे. त्यानुसार काम क्रंमाक १) चे प्रशासकीय आदेश क्रं.११०/ दि.११/०६/२०१३ अन्वये रक्कम रु.४३८८०/-चे खर्चास मान्याता देऊन त्यांना कार्यादेश क्रं./५६/दि.१३/०६/२०१३ रोजी देण्यात आला, असुन सदर कामाचे देयक मोजणी पुस्तक क्रं.एफ-८ पां.नं. १७६-१७७ नुसार रक्कम रु.४३८८०/-पाहिले व अंतिम देयक तयार आहे. तसेच काम क्रंमाक २) चे प्रशासकीय आदेश क्रं.११२/ दि.११/०६/२०१३ अन्वये रक्कम रु. ४७९३३/- चे खर्चास मान्यता देऊन त्यांना कार्यादेश क्रं./६५ / दि.१०/०७/२०१३ रोजी देण्यात आला, असुन सदर कामाचे देयक मोजणी पुस्तक क्रं.एफ-८ पां.नं. १७४ वर नमुद केले आहे, रक्कम रु.४७९३३/-पाहिले व अंतिम देयक तयार आहे.

दोन्ही कामांचे अहवाल वरील आहेत,मोजणी पुस्तकात तत्कालीन शाखा अभियंता यांची स्वाक्षरी आहे. मोजणी पुस्तकातील नोंदीनुसार आजची परिस्थिती शाखा अभियंता यांनी केलेली असुन त्याचे अहवाल नुसार आजरोजी पाईपलाईन अस्तित्वात असुन पाणी पुरवठा सुरळीत होत असल्याचा अहवाल दिलेला आहे. मक्तेदार यांनी करारनामा करुन दिलेला नसल्याने मोजणी पुस्तकात व उक्त नमुद कामांचे देयकांवर तत्कालीन उप अभियंता यांची स्वाक्षरी नसल्याने मोजणी पुस्तकानुसार कामांचे देयक पुढील मान्यतेकरीता सादर झालेले नसल्याचे दिसुन येते त्यामुळे पाणी पुरवठा विभाग झोन क्रं.११ अंतर्गत वार्ड क्रं.३३ मध्ये केलेल्या कामाचे देयक रक्कम रु.४३,८८०/- व वार्ड क्रं.०८ मध्ये केलेल्या कामाचे देयक रक्कम रु.४७,९३३/- मात्र मक्तेदार यांचे देयक अदायगी करणेस व त्यांचेकडुन करारनामा करुन घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- श्री.खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** जळगांव महानगरपालिकेतील वाहन चालक श्री.लनी मार्टीन जोसेफ यांची पती-पत्नी एकत्रीकरण धोरणाअंतर्गत, जळगांव मनपा वाहन चालक या पदाची सेवा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.लनी मार्टीन जोसेफ,वाहन चालक,बांधकाम विभाग यांनी त्यांच्या अर्जात " माझी पत्नी जिल्हा सामान्य रुग्णालय,पुणे अंतर्गत अधिपरिचारीका या पदावर कार्यरत आहे. पत्नी व मुले पुणे येथे स्थायीक झालेले आहेत. मी व माझे वृद्ध आईवडील जळगांव येथे बऱ्याच वर्षांपासून वास्तव्यास आहे. त्यामुळे पती-पत्नी एकत्रीकरण धोरणाअंतर्गत, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत आंतरजिल्हा बदली करण्यात यावी असे नमुद केलेले आहे.

श्री.लनी मार्टीन जोसेफ यांच्या पत्नी सौ.लता जोसेफ हया जिल्हा सामान्य रुग्णालय,पुणे अंतर्गत अधिपरिचारीका या पदावर कार्यरत आहे. त्यांचे आई-वडील वृद्ध असून त्यांचे वय जास्त असल्याने त्यांचे आजारपणात त्यांचे सोबत राहणे आवश्यक असल्याने व अत्यंत गैरसोय होत असल्याने त्यांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे बदलीने नेमणूक मिळणेसाठी ना-हरकत पत्र देणेस महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्र. SRV-१०९७/प्र.क्र.२०/९७/बारा,दि.२७ नोव्हेंबर,१९९७ अन्वये शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात ठरविलेल्या धोरणानुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- श्री.खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** जळगांव महानगरपालिकेतील शिपाई श्री.खुमानसिंग बिज्या वळवी यांची जळगांव मनपा शिपाई या पदाची सेवा नगरपरिषद नंदुरबार, शहादा किंवा नगरपरिषद तळोदा येथे बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.खुमानसिंग बिज्या वळवी,शिपाई,दवाखाने विभाग यांनी त्यांच्या अर्जात " माझी पत्नी सौ.कमला खुमानसिंग वळवी हया जि.प.नंदुरबार अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजना धडगांव,बिट कात्री,अंगणवाडी केंद्र पौतीपाडा येथे आदिवासी अतिदुर्गम भागात अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहेत. मुले शिक्षणासाठी बाहेरगावी असल्याने पत्नी व माझे वयोवृद्ध आई,वडील रा.कात्री ता.धडगांव जि.नंदुरबार येथे राहतात व मी नोकरी निमित्ताने जळगांव येथे असतो.आई वडील दोघेही वयोवृद्ध असल्याने त्यांचे पालन पोषण व देखरेखीची जबाबदारी कुटूंबकर्ता म्हणून माझ्यावर आहे. एकीकडे आई वडील वयोवृद्ध व दुसरीकडे पती - पत्नी २५० ते ३०० कि.मी. अंतरावर वेगवेगळे असल्याने अशा परिस्थीतीत माझी दैनाव्यस्था व दमछाक झालेली आहे.त्यामुळे पती-पत्नी एकत्रीकरण धोरणाअंतर्गत,माझी सेवा नगरपरिषद नंदुरबार शहादा किंवा नगरपरिषद तळोदा येथे आंतरजिल्हा बदली करण्यात यावी असे अर्जात नमुद केलेले आहे.

श्री.खुमानसिंग बिज्या वळवी यांची पत्नी जि.प.नंदुरबार अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजना धडगांव,बिट कात्री,अंगणवाडी केंद्र पौतीपाडा येथे आदिवासी अतिदुर्गम भागात अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचेकडेस वृद्ध आई-वडीलांची पालन पोषणाची जबाबदारी असल्याने पती पत्नी यांना एकत्रित ठेवण्याच्या शासन परिपत्रक क्र. SRV-१०९७/प्र.क्र.२०/९७/बारा,दि.२७ नोव्हेंबर,१९९७ च्या धोरणानुसार त्यांना नगरपरिषद नंदुरबार, शहादा किंवा नगरपरिषद तळोदा येथे आंतरजिल्हा बदली करणेकामी ना-हरकत पत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- श्री. खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- श्री. पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** जळगांव महानगरपालिकेतील श्री.किशोर वसंतराव वाघमारे यांची जळगांव मनपा वाहन चालक या पदाची सेवा जिल्हा परिषद, जालना येथे बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.किशोर वसंतराव वाघमारे,वाहन चालक,बांधकाम विभाग यांनी त्यांच्या अर्जात " माझी पत्नी हया शासनाच्या महिला व बालकल्याण (बालविकास) विभाग जालना येथे सेविका म्हणून कार्यरत आहे. व माझी मुलगी अंशत: अपंग असुन,आई व वडील वयोवृद्ध आहेत नेहमी आजारी असतात,कर्ता मुलगा म्हणून त्यांची देखभाल करणे ही माझी जबाबदारी आहे.परंतू कर्तव्य बजावून कौटूंबिक जबाबदारी पार पाडतांना माझी दैनावस्था होत आहे. त्यामुळे पती-पत्नी एकत्रीकरण धोरणांतर्गत, महानगरपालिका जालना किंवा जिल्हा परिषद जालना येथे आंतरजिल्हा बदली करण्यात यावी असे अर्जात नमुद केलेले आहे.

श्री.किशोर वसंतराव वाघमारे यांची पत्नी श्रीमती.रंगोले केशर संपतराव हया महिला व बालकल्याण (बालविकास) विभाग जालना येथे सेविका म्हणून कार्यरत आहे.त्यांची मुलगी अंशत: अपंग असुन त्यांचे आई-वडील वृद्ध असून त्यांचे वय जास्त असल्याने त्यांचे आजारपणात त्यांचे सोबत राहणे आवश्यक असल्याने व अत्यंत गैरसोय होत असल्याने त्यांची जालना जिल्हा परिषद येथे बदलीने नेमणूक मिळणेसाठी महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र. SRV-१०९७/प्र.क्र.२०/९७/बारा,दि.२७ नोव्हेंबर,१९९७ अन्वये शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात ठरविलेल्या धोरणानुसार ना-हरकत पत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- श्री.खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह.) मौजे मेहरुण स.नं.२८६ (भाग) मधील आरक्षण क्र.२५८, क्रिडांगण या आरक्षणाच्या स्थानात बदल (स्थलांतरीत) करुन ते मौजे मेहरुण स.नं.२८१/१ पैकी जमिनीमध्ये दर्शविण्यास शासनाकडे अंतिमत: प्रस्ताव सादर करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-**. मेहरुण सर्व्हे नं. २८६ व सर्व्हे नं.२८१/१ याच्यात फेरबदल करुन अर्जदाराला काय साध्य करायच आहे. आपल्याला काही अडचण आहे की, अर्जदाराला काही अडचण आहे. याची माहिती द्या.

**श्री.धामणे, नगररचनाकार :-** अर्जदाराने आपल्याकडे त्या सस्थेची जी हे केलेली आहे ती त्या हायस्कुल मॅनेजर शी बोलले होती की २८१ मध्ये त्या हायस्कुल साठी आणि ते दोघेजणही तयार आहेत.आता त्यांनी शाळेसाठी जी जमिन घेतलेली आहे. दोन्ही जमिनी प्लेन आहे. त्यानी शाळेसाठी जी जमिन घेतली आहे त्याच्यासाठी हा भुखंड कामात पडेल याच्यासाठी आपण ठराव केलेला आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-**. बरोबर आहे , त्यांच्या सोईसाठी आपण करतो आहे . याचा अर्थ असा आहे. आपल्या महापालिकेला काही अडचण आहे का ?

**श्री.धामणे, नगररचनाकार :-** महापालिकेला काही अडचण नाही, फक्त आपण साईट बदलत आहे. प्लेग्राऊंड या बाजुला काय आणि त्या बाजुला काय ? तसे काही विशेष फरक पडत नाही.

**श्री.सदाशिव ढेकळे :-**. माझी माहिती अशी आहे की , आपले राजेंद्र भाऊ घुगे पाटील जे आहेत त्यांनी सांगीतले की , आपण जो हा ठराव करता आहेत. तर त्याच्यामध्ये फेरफार झालेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे.तर याच्यामध्ये राजु भाऊ आपण माहिती घ्या .

**श्री.राजेंद्र पाटील :-**. सर्वे नं.२८१ चा हा जो विषय आहे त्याच्या लगतचा भाग खरेदी केला गेला आणि त्याची विभागणी पण झालेली आहे. आणि स.नं.२८१/१ जो आहे. हा माजी नगराध्यक्ष स.ना. भालेराव यांनी त्या परिसराला नॅशनल पार्क झोन मध्ये दिलेला होता. ते जे आरक्षण आहे जर निघालेल असेल तर द्यायला हरकत नाही. ते खात्री करुन प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-**. आपल्याला अडचण निर्माण होईल असे करु नका. परत तुम्ही खात्री करा. वाटलस तर या कार्यवाहीला थांबवा. खात्री करा आणि मग ठेवा. आपल्याला अडचण होणार नाही या प्रकारे करा. आम्ही भोगत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** संपुर्ण कायद्याचा प्रक्रियेचा अवलंब करुन ज्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्याच्यावर सजेशन ॲब्जेक्शन झाल आहे. आणि फक्त टेक्नीकल फॅरमेट आहे की, हा ठराव पुनश्च अंतीम म्हणुन राज्य

शासनाकडे पाठवायचा आहे.  या मध्ये कुठेही नियम बाहय किंवा कायद्याच उल्लंघन झालेल नाही. या संदर्भात कुठेही कायदेशीर अडचण असेल तर प्रशासन तपासुन त्या अनुषंगाने तो प्रस्ताव अंतिम राहील.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विषय क्र.८, १२, व १४ म.न.पा.ची आर्थिक परिस्थिती बघता त्यांना टी.डी.आर. देण्यात यावा आणि बाकीचे विषय मान्य आहे प्रशासनाने पाठविलेले. त्याची सुचक अनुमोदकची यादी देऊन देवु आम्ही.

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर आहे  का?

**श्री.भगत बालाणी :-** हो सर्वानुमते मंजुर आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.११ मध्ये एक सुचना आहे. विषय क्र.११ मध्ये आपण कोटयावधी रुपयाची जागा आपण देत आहे. येथे एक सुचना अशी आहे की तिथे जी जागा आहे तीच जागा पुरेशी नाही. तर जी पोलिस क्वॉर्टर्सची जी जागा आहे तशी लोकांकडुन मागणी आलेली आहे. ती जागा सुध्दा आरक्षणात समाविष्ट करुन अशी सुचना शासनाला पाठवायची ही विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** नाही, आता आपले जे Specification आहे ते आपण स्वतंत्र दोन वेगवेगळी आरक्षण दिलेले आहे. स्वतंत्र जर मागणी आली तर न्यायालयाला शासनाकडे मागणी करावी लागेल. त्या वेळेस स्वतंत्र विषय असतील त्या वेळेला आपण देऊ.

**श्री.नितीन लढढा :-** पटलावरचे सर्व विषय झालेले आहे. एक महत्वाचा विषय असा आहे. काव्यरत्नावली चौक ते रामानंद नगरचा रस्ता, अत्यंत वाईट परिस्थिती रस्त्याची झालेली आहे. माझी सुचना अशी आहे की, जी कामे आपण १०० कोटी जे टेंडर झाल त्याच्या मध्ये प्रस्तावीत केलेले आहे. आणि त्या १०० कोटीच्या कामांना राज्य शासनाने स्थगित केलेल आहे. आता स्थगिती राज्य शासनाने दिलेली असल्याने त्याच्या बाबतीत अस समजा आपण हॅण्डीकॅप आहोत. जरी आपण ती सर्व प्रक्रिया पार पाडुन निविदा प्रक्रिया पर्यंत आलेलो आहे. स्थगिती केव्हा उठेल, उठणार की नाही उठणार या संबंधात सुध्दा कल्पना नाही. जरी आम्ही शिवसेनेचे सदस्य असलो आम्ही आमच्या पध्दतीने पाठपुरावा करु. परंतु एकीकडे राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती पाहता आणि राज्य सरकारच्या असलेल्या प्राथमिकता, या कारणाने या निधी मिळणेचा केव्हा स्पष्ट होईल हे सांगता येणार नाही. आता अमृत योजने अंतर्गत जी चारी तेथे खोदली गेलेली आहे. त्यानंतर रिपेअर करणेच काम मक्तेदाराच आहे. मी सकाळी माहिती घेतली, ती साधारणता एक ३ मिटरची चारी आहे आणि ३ मिटरची चारी WBM झालेली आहे. आणि पुनश्च त्याच्यावरती डांबरीकरण करण्यात येईल. तो साधारणता १८ मिटरचा रस्ता आहे. आजु बाजुच्या गटारी सोडल्या तर १५ मिटर रस्ता तेथे आहे. १५ मिटरच्या रस्त्यामध्ये फक्त ३ मिटरची चारी पुर्ववत करण्यात येईल डांबरी करणाने परंतु त्या रस्त्यावर वरदळ आणि वाहतुकीचा प्रचंड काम पाहता, प्रत्येक जन त्या ३ मिटरच्या चारी वरुन वाहतुक करण्याची आपली माणसिकता ठेवेल. याच्या मध्ये येणारी आणि जाणारी ट्रॅफिक त्या ३ मिटर वरुन प्रवास करु शकणार नाही. त्याच्यामध्ये ॲक्सीडेंट होण्याची शक्यता असेल. आणि राज्य शासनाची स्थगिती केव्हा उघडेल ते काही सांगता येत नाही. समजा राज्य शासनाच्या स्थगिती उघडण्यास जर आपण प्रतिक्षा करत राहिलो. तर साधारणता ६ महिने जातील वर्ष जाईल की, दोन वर्ष जातील याची निश्चिती नाही. जर आपला हा रस्ता WBM मध्ये गेला तर WBM मध्ये हा रस्ता मेनटेन राहिन का नाही याची सुध्दा खात्री नाही. म्हणुन मला वाटत की, संपुर्ण रस्ता हा नविन करायचा असेल तर साधारणता १ कोटी रुपये खर्च येईल. मला वाटत की, शहरातल्या त्या भागाची परिस्थितीचा विचार करता, जो मक्तेदार त्या ३ मिटर रस्त्याच काम करेल. त्याच मक्तेदाराला मान्यता देऊन कार्यादेश देण्यात यावे. जे टेंडर १०० कोटीतुन आलेल असेल त्याची १ कोटी काही कॉस्ट आहे. ते काम रद्द कराव. ते १ कोटीचा निधी नंतर जर राज्य शासनाकडुन मंजुर होऊन आले तर  त्या १ कोटीत आपल्याला भरपुर कामे आहे करायला शहरात. त्या १ कोटीच नियोजन कुठेतरी आपण करु शकतो. परंतु जर त्या निधीचीच वाट बघत असलो तर त्या रस्त्याची परिस्थिती आपण स्वत: होऊन बघितली तर मी म्हणतो, टु व्हिलर सोडा, फोर व्हिलरवर जाणे सुध्दा जीकरीच झालेल आहे. या गोष्टीच कुठेतरी विचार करावा. शहराचा प्रमुख रस्ता आहे. आणि सामान्य वस्तीचाही त्या ठिकाणी वापर आहे. अश्या पध्दतीने काही तरी निर्णय आपल्याला घ्यावे लागतील. निधीची कमीतकमी आपल्याकडे उपलब्धता आहे. आज मार्केट वसुलीचे साधारणता ५०-५५ कोटी रुपये आपल्याकडे आहे. त्या निधीचा प्रशासनाने नियोजन ही केलेल आहे. त्या काही प्रशासकीय शासकीय निधी सुध्दा आहे. कुठेतरी नागरी सुविधावर सुध्दा प्राधान्याने फोकस करणे गरजेच आहे. तर या गोष्टीच कुठेतरी विचार व्हायला पाहिजे. आणि या १ कोटीला सभागृहाने मान्यता द्यायला पाहिजे. आणि मान्यता देऊन ज्या निविदा झालेल्या आहे त्यातुन १ कोटीचे कामे रद्द करुन घ्या कामाला प्रस्तावीत करुन तातडीने त्या ठिकाणी नव्याने डांबरीकरण करणे खुप गरजेच आहे. आणि या पध्दतीने अजुन जे शहरातील वर्दळीचे रस्ते असतील की तेथे काय झालेल आहे अमृतच काम ही त्याठिकाणी पुर्णत्व झालेल आहे. भुयारी गटार योजना भविष्यात तेथे नाही. म्हणुन अश्या पध्दतीने तेथे केलेला खर्च याचे कुठेही उपयोग होणार नाही. ती सुध्दा मी माहिती घेतलेली आहे. अश्या पध्दतीने शहराच्या इतर भागामध्ये भुयारी गटार राबविण्याच्या संदर्भात भविष्यात ५-१० वर्षात योजना राबविली जाईल परंतु अमृतची कामे पुर्णत्व झालेली असेल. अश्या भागातील रस्त्यांची निकड पाहता

कुठेतरी नियोजन करणे हे क्रमप्राप्त आहे. अन्यथा खुप प्रमाणावर नागरीकांमध्ये चिड आणि नाराजीच वातावरण पसरलेल आहे आणि त्या साठी राज्य शासनाच्या निधीची वाट न पाहता, आपल्याकडे जो निधी आहे त्याच योग्य पध्दतीने नियोजन केल. तर मी निश्चितपणे म्हणतो महानगरपालिकेला ही समाधान मिळेल, नागरीकांना ही समाधान मिळेल आणि कुठेतरी पुर्ण विकास न करता टप्प्या टप्प्याने का होईना अश्या पध्दतीने विकास चालत राहिला तर नागरीकांना ही त्याच्यात समाधान प्राप्त होईल अशी माझी ह्या सभागृहाला विनंती आहे.

**श्री.अनंत जोशी :-** सन्मा.महापौर साहेबा व संपुर्ण सभागृह, सर्व प्रथम मी आमचे नेते नितीनभाऊंचे मी मनापासुन आभार व्यक्त करतो. कारण नितीन भाऊ मगाशी बोललो होतो ईतका वेळ तो रस्ता शहरातील अनेक भागांना जोडणारा जरी असला आणि ईतरही काही गोष्टी आहेत. नितीन भाऊ असतील , उज्वला ताई असतील , राणे ताई असतील आम्ही बघतोय अतिशय वाईट परिस्थिती आहे. मी यावर काही बोलत नाही , नितीनभाऊंनी सगळं सांगीतलेले आहे. त्यावर लवकर कार्यवाही करावी अशी अपेक्षा आहे . आणि माझी विनंती आहे की अमृत चं जे काम होतयं शहरात आणि अमृतचं जे काम आहे त्याच्याबाबतीत वृत्तपत्रांमध्ये मोठ मोठं लिखाण होतयं .परत त्यात जास्त भर पडेल आणि मनपाची आर्थिक परिस्थिती जी आहे हे आपल्यालाही माहिति आहे. आणि जळगांव शहराच्या नागरीकांनी याला मान्य केलेलं आहे. गंमत अशी आहे सर की , जळगांव शहराचे लोकं फार सुशिल व सहनशिल आहेत , एखादं दुसरं शहर असतं तर आमचं काही खर नसतं. आपण शहराला काहीच सुखसोई सुविधा पुरवु शकले नाहीतं. आणि सगळयात महत्वाचे की रस्त्यांची जी परिस्थिती आहे ती अतिशय वाईट आहे.आतापर्यंत आपण शहराच्या रस्त्यांबाबतचं बोलत आहे. फक्त मातीच्या रस्त्यांच आपण समजु शकतो पण आज जी परिस्थिती आज शहरात मुख्य रस्त्यांची आहे. जी धुळ रस्त्यांवर वाहतुकीमुळे होते आज नाही तर याचा आरोग्यावर परिणाम येणाऱ्या दोन चार पाच वर्षात या शहराच्या नागरीकांना या संदर्भातले होणारे आजार जाणवतील आणि खुप मोठया प्रमाणावर आपल्या जळगांव शहरात दिसतील. मला या विषयास अनुसरुन एक विनंती अशी करायची सर. आपल्याकडे बांधकाम विभाग आहे. अमृत योजना जी आहे. ती शहरात बऱ्याच ठिकाणी म्हणजे ज्या एरियाज चा उल्लेख नितीन भाऊंनी केला किंवा इतर ठिकाणी बऱ्याचपैकी अमृतची पाईपलाईनच काम झालेल आहे. अमृतच जे काही टेंडर असेल त्यात जे काही अटीशर्ती असतील त्यामध्ये रोलींग बेसींग सुध्दा होत काही ठिकाणी ते झालेल आहे आणि काही ठिकाणी सुरु आहे आज देखील, अनेक कामे असे आहे अनेक भाग असे आहे ज्या ठिकाणी वर्षभराचा कालावधी ओलांडलेला आहे आणि अमृतच काम संपलेल आहे. आज त्या रस्त्यांवर सर्वात जास्त त्रास आहे आणि पाऊसाळयामुळे जास्त झालेल आहे. त्या जे चाऱ्या आहे तेथे रोलींग बेसींग केलेल नसेल किंवा व्यवस्थीत झालेल नसेल. माझी विनंती अशी आहे की, आपल्याकडे पैसेंची उपलब्धता आपल्याकडे जे काही फंड असतील त्या अनुषंगाने संपुर्ण शहराला रस्त्यांची गरज आहे. म्हणजे फक्त मुख्य रस्त्यांवरती आपण बोलत असतो पण कॉलनीतील सुध्दा जे रस्ते आहे रहिवास भागातले इतके दयनिय अवस्थेत आहे की, कदाचित इतक्या वर्षात छोट शहर आहे इतके वर्षाचे प्रत्येक नगरसेवकाचे संबंध आणि छोट शहर असल्यामुळे एकमेकाचे घरोबाचे संबंध त्यामुळे फक्त आम्ही मार खात नाही नगरसेवक, मी खरं सांगतो आहे तुम्हाला, आमच्या येथे प्रत्येकाचे संबंध घराघरात असता. लोकांनी फक्त मारायचे बाकी ठेवलेले आहे. आणि संबंधांमुळे ते हात उचलत नसतील ही सत्य परिस्थिती आजच्या जळगांव शहराच्या रस्त्यांच्या बाबतीत आहे. माझी विनंती अशी आहे की आपल्याकडे निधी उपलब्ध जेव्हा होईल तेव्हा होईल. शासकीय निधी नाही. मनपा फंडातुन आपण काही करु शकत नाही किंवा करु शकतो मला ह्याचा संबंध नाही. योग्य पध्दतीचा करार निधीचा आहे. माझी विनंती अशी आहे की, बांधकाम विभागामध्ये आपल्याकडे अनेक मजुर आहे. मला भोळे साहेबांना विचारायच आहे. साहेब आपल्याकडे बांधकाम विभागात मजुर म्हणुन काम करायला किती लोकं आहेत.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता:-** आज आपल्याकडे काम करणारे ३० मजुर आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण महानगरपालिकेत फक्त ३० आहेत.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता:-** होय . म्हणुनच आपण मक्तेदाराकडुन मजुर लावुन आपण डांबरपट्टीचे कामं सुरु केलेले आहेत.

**श्री.अनंत जोशी :-** नाही साहेब आपल्या कामाची परिस्थिती इतकी गंभीर आहे की याची कल्पना आपल्यालाही आहे . तुम्ही आता रिटायर्डमेंट ला आहात तुमचं आख्ख आयुष्य या महापालिकेत गेलेलं आहे. आपल्याकडे एक पॉटहोल मशीन आहे ते केव्हा निघतं जेव्हा पेपरबाजी होते, ओरड होते तेव्हा आपल्याला वाटतं की नाही हे कामं केले पाहीजे तेव्हा ती मशीन रथासारखी बाहेर काढली जाते .आणि त्याचं काम जं आहे खड्डे बुजविणं ते काम केलं जातं. आता ते काम कसल असत, कुठल्या पध्दतीच असतं. ते आपल्याला माहित नाही.मला जायायच नाही खोलामध्ये, मला काळजी भविष्याची वाटते, भोळे साहेबांच रिटायरमेंट जवळच आहे. चांगले चांगले अधिकारी जात आहे. माझ म्हणणे असे आहे की, माणस जास्त आहे आपल्याकडे, सर एकच विनंती आहे. रस्ते होईल तेव्हा होईल. डांबरीकरण होईल तेव्हा होईल. इतक सगळ बोलण्याच्या मागच कारण इतकच आहे. अमृतचे कामामुळे असेल किंवा इतर काही टेबलचे काम याचे काम त्याचे काम. रस्त्याची अशी

अवस्था झालेली आहे. रस्त्यांच जे कोटींग असत ते उखडलेल आहे. पाऊसामुळे म्हणा की,अनेक वर्षापासुन काम झाल नाही म्हणुन म्हणा, जी बारीक खडी असते, किंवा मुरुम असतील, दगडं असतील हे पुर्ण शहरामध्ये मुख्य रस्त्यांवर पसरलेले आहे. कॉलनी भागातील रस्त्यांवर पसरलेले आहे. अनेक नागरीक फक्त इतकी अपेक्षा व्यक्त करतात. तुम्ही रस्त्यांचे काम कराल तेव्हा कराल महापालिकेचे पैसे येतील तेव्हा येतील. तुम्ही कमीत कमी माणस लावुन रस्ते तरी स्वच्छ करुन द्या. तेथे बारीक खडे आहे, गोटे आहे, दगड आहे मुरुम आहे, अमृतच काम काय आहे काय नाही, त्याला काम देऊन एक वर्ष झालेल आहे. आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडुन जर आपण प्रभाग निवडलं. प्रभाग क्र.१,२,३,४ अस निवडल आणि जितके काही ४०-५० माणस असतील. साहेब एक एक आठवडा जरी निवडल तर रस्ते स्वच्छ होवुन जातील. आणि तुम्हाला जर समजत नसेल.मी जे बोलत आहे तुमच्या पर्यंत पोहचत नसेल तर मी परिस्थिती दाखवेल की, काही ठिकाणी काय होऊ शकत. खड्डे बुजविले जातील, रस्ते होतील, डांबरीकरण होईल, फक्त माझी जी विनंती जर तुम्ही मनावर घेतली. आपली जी यंत्रणा आहे माणस असतील ट्रॅक्टर असतील मजुर असतील आणि ते रस्ते जर व्यवस्थीत क्लीयर केले. तर बराच प्रॉब्लम सॉल होईल. भाऊंनी जस येथे ज्या रस्त्याचा उल्लेख केला त्याच रस्त्यावर शाह म्हणुन एक व्यापारी आहे. मला वाटत शनिवारी किंवा रविवारी रात्री ते पडले आहे. वयस्कर आहे ५०-६० वर्षाचे आहे. ते पडले त्या रस्त्यावरुन त्यांना डोक्यावर टाके पडलेले आहे. निव्वळ त्या दगड आणि खड्डयांमुळे. भोळे सर एक विनंती आहे. महापौर आणि उपमहापौर यांना ही विनंती आहे की, प्रत्येक नगरसेवकाला एक एक आठवडा द्या आणि तुम्हाला प्रभाग काय काय करायचे आहे ते करुन घ्या.तर बराच प्रॉब्लम सॉल होईल बाकी काय आहे रस्त्याच नियोजन ते निधी आल्यावर तुम्ही करत बसा. धन्यवाद.

**श्री.नितीन लढढा :-** असे ठराव करायचे असेल तर करुन घ्या. तो काही माझा वार्ड नाही. परंतु जेव्हा आपण शहरातली परिस्थिती पाहतो आणि ज्या वेळेला आपण त्याच आकलन करतो, खरच वाईट वाटत. मी माझ्या वार्डाचा काहीच मुद्दा मांडलेला नाही. कारण माझा वार्ड अजुन सुस्थिती मध्ये आहे परंतु या प्रभागाची परिस्थिती अत्यंत दयनिय झालेली आहे. आपण असा ठराव करा आणि ठरावात त्याच नियोजन करा. आता ठराव नका करा परंतु जेव्हा ही पुढे वीस दिवसाने किंवा एका महिन्याने महासभा होईल तेव्हा जर तुम्हाला माझा विचार योग्य वाटला तर तेव्हा घ्या. एक महिना वाया जाणार त्यात. म्हणुन निर्णय घ्या त्याच्यावर ठराव घेतल्यानंतर त्याच्यावर अंमलबजावणी करायची की नाही करायची तो प्रशासनाचा आणि पदाधिकारीचा अधिकार आहे. परंतु गेलेला एक महिना परत मिळविता येणार नाही. तरी माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझी सभागृहाला विनंती आहे की आपल्या शहरामध्ये आर्थिक परिस्थिती, विकास काम, रस्ते या संदर्भामध्ये आपली चर्चा चांगली आहे. आपण त्यात काही अडथळा आणायचा असा विषय नाही. संपुर्ण शहराची परिस्थिती बिकट असल्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे संपुर्ण सभागृहाला विनंती आहे. ज्या १०० कोटी रुपयाला शासनाने स्थगीती दिलेली आहे. सर्व सदस्य मिळुन मुख्यमंत्रींना विनंतीचा ठराव करु. शिवसेना आपल्या सोबत आहे नितीन भाऊंनी आधीच सांगितल.

**श्री.नितीन लढढा :-** आम्ही तुमच्या मताशी सहमत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपण ठराव करुन ओहापोह करुन पाठपुरावा करुन मुख्यमंत्र्यांना विनंती करु. ही स्थगिती उचलुन विकास कामांना फास्ट ट्रॅक वर घेवुन करु. करता येईल तो आपल्याला असे माझे म्हणणे आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई विशालजींचे विचार जे आहेत तेही योग्य आहेत यात काही दुमत नाही .आपण जसे विशालजींनी सांगीतले तश्या पध्दतीचा सुध्दा एक ठराव होऊ शकतो .आणि तो सर्व पक्षीय व सर्वानुमते झालेला आहे .महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.उध्दवजी ठाकरे साहेब यांना विनंती करू की आमच्या या शहराच्या या बिकट परिस्थिती मध्ये आपण दिलेली स्थगितीबाबत ती उठविण्याच्या संदर्भात तातडीने निर्णय घेण्यात यावा . परंतु त्याच वेळेला अश्या पध्दतीचा ठराव सुध्दा करून दोघं पक्ष साहेबांकडे जावु या . कारण राज्याच्या परिस्थितीचा विचार करता तो निधी केव्हा मिळेल याची शाश्वती नाहीये.निश्चितपणे अश्या पध्दतीचा ठराव करणे , विनंतीच आहे . परंतु या परिस्थितीमध्ये कुठतरी तुम्हाला पर्यायी नियोजन सुध्दा तुम्हाला चालु ठेवावं लागेल .अन्यथा काय होईल की ते १०० कोटी येतील आणि त्या १०० कोटींच्या अपेक्षेवर आपण या शहरातील नागरीकांना खुप जास्त दिवस वेठीस धरू शकणार नाही . ही अत्यंत योग्य अशी सुचना आहे. आणि मला वाटत की या सुचनेचे सभागृहाने कुठेतरी चिंतन करायला पाहीजे. नाही केले तरी मला काही फरक पडणार नाही.तो माझा प्रभागही नाहीये परंतु या शहरातील सर्वसामान्य जनता जी आहे ही खरचं विवंचेतेच्या अवस्थेमध्ये आहे. आपण दोघेही ठराव करा . म्हणजे हा ठराव गेला की उद्या त्याचे काम सुरू होवुन जाईल याच्यात काही वाद नाहीये.आणि या पध्दतीने जे रस्ते लागुन असतील शहरामध्ये की तिथे १०० टक्के अमृतचे कामं पुर्णत्वास असतील .

**मा.उपमहापौर :-** म्हणजे जोड रस्ते म्हणायचे आहेत .

**श्री.नितीन लढढा :-** उपमहापौर साहेब यामध्ये अडचणी काय येतात की या मध्ये अमृतचे काम १०० टक्के पुर्ण झालेले आहे. दुसरं की त्या भागामध्ये भुयारी गटारींची योजना प्रस्तावित नाहीये. दुसरं सेकंड फेज जी भविष्यात कधी होईल याची कल्पना तुम्हाला किंवा मला नाहीये. आणि त्यामध्ये सुध्दा ४ ते ५ वर्षांचा कालावधी जाईल त्यापेक्षा भुयारी गटारींच्या

योजनेचा विचारही केला तरी तो ५ वर्षांचा कालावधी जाईल. यामध्ये तांत्रिक अडचण अशी कुठेचं नाहीये. कायदेशीर त्रुटी याच्यात नाहीये.निधीचा दुरूपयोग होणार नाही. आता अश्या पध्दतीचे ईतर गावांमध्ये असे रस्ते असतील की तिथे अमृतची कामे पुर्णत्वास असतील.आणि भुयारी गटार योजना त्या भागात प्रस्तावित असेल.आणि तो रस्ता त्या भागाला जोडणारा रस्ता असेल अश्यांची सुध्दा एक यादी करून अश्या पध्दतीने टप्या टप्प्याने त्यांचे नियोजन करीत चला .तोपर्यंत १०० कोटी रूपयांचा निधी मंजुर होवुन आला तर त्याचा आनंदच आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर साहेब आता बंटी भाऊंनी जो विषय सांगीतला की आपण हे करून घ्या. पहिला मुद्दा हे की, तुम्ही म्हणता इकडुन निधी आना तिकडुन निधी आना, अमृतचा जो निधी पडलेला आहे ते अमृत योजनेचा काम केव्हा करणार आहे. या विषयाच उत्तर द्या. एक वर्ष होऊन ही सात आठ महिने झाले, याच उत्तर द्या.

**श्री.अनंत जोशी :-** माझा विषय असा आहे नवनाथ भाऊच्या विषयाला मी बोलायला नको. माझा विषय, आणि दादाचा विषय आणि मक्तेदाराचा विषय आहे. माझ म्हणण फक्त इतक आहे की, आपण जे अमृतच जो विषय घेतला, नवनाथ भाऊंनी ही घेतल की, त्यांची जबाबदारी आहे त्यांच काम आहे सुरु करणे, त्यांनी जे चाऱ्या खोदलेल्या आहे त्या चाऱ्यांच त्यांनी फक्त रोलींग बेसींग करुन किंवा जे कॉंक्रीटींग असेल ते करायचे आहे. हा विषय स्थायी समितीच्या मिटींग पासुन चाललेला आहे. परत सगळ विषय सांगायला काही अर्थ नाही. आता विशाल भाऊंनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांना आपण विनंती करावी की, आपली निधीवरची स्थगिती उठवुन द्यावी. तो विषय एकदम योग्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बंटी भाऊ माझ्या वार्डात अमृतच काम काही ठिकाणी झालेल आहे काही ठिकाणी नाही झालेल आहे. आता ड्रेनेजच काम चालु आहे. वापस रोड फुटतील.

**श्री.अनंत जोशी :-** मगाशीपण माझ तेच म्हणण होत आता ही तेच म्हणण आहे. हे काही माझ तुमचा विषय नाही. हा विषय शहराचा आहे. मी काही माझ्या घराजवळच किंवा वार्डाच नाही बोलत आहे. मी संपुर्ण शहराच बोलतो आहे. नितीन भाऊंनी जे सांगितले की, शहराच्या काही भागांमध्ये अमृतच काम पुर्णत्वात गेलेल आहे किंवा ६०% व ८०% झालेल आहे. एक एकाला ७-७ महिने ८-८ महिने लोटलेला आहे कालावधी. होत काय आहे. एक अमृतचा विषय एक भुयारी गटारीचा विषय, अमृतचा विषय पहिल्या फेजचा विषय काही ठिकाणी झालेला आहे. काही ठिकाणी अजुन ही सुरु झाल नाही. आर्ध्या शहराच तेच काम दुसऱ्या फेज मध्ये आहे. आता विषय असा आहे की, अमृतच्या नावाखाली भुमीगत गटारीच्या नावाखाली आपण त्यांना मुद्दा बनविता आहोत आपण लपता त्याच्या मागे. अनेक ठिकाणी परिस्थिती अशीच आहे. आपण त्याच्या नावाखाली लपत आहोत. ठराव करा सर्वे मिळुन मुख्यमंत्र्यांना निवेदन द्या परंतु आजचा विषय होता. ज्या ठिकाणी काम आपण करु शकतो. ज्या ठिकाणी कामे आपण तातडीने हाती घेऊ शकतो. नियोजन आहे म्हणुन आणि विषय नं.१ मी भोळे साहेबांना विनंती केल्या प्रमाणे बांधकाम विभागाचे किती असे कर्मचारी असतील त्यांना आपण वेगळया पध्दतीने कामाला लावु शकतो का ? सर मला एक विचारायच होत. मी पुर्वीही बोललो की, बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांकडुन रस्त्यांवर लावुन रस्त्यावर व्यवस्थीतपणा येईपर्यंत काम करु शकतो. आणि या सभागृहाच्या सहमतीने मी महापौरांना शब्द देतो की, अभियंत्यांसोबत राहुन काम करुन घेण्याची जबाबदारी माझी संपुर्ण शहराची. त्याच नियोजन करायची आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावुन काम करु शकतो इमप्लीमेंट करुन घेण्याची जबाबदारी माझी. भोळे साहेबांसोबत काम करून मी इमप्लीमेंट आणु शकतो .त्यांच्यासाठी आणि माझ्यासाठी माझी तयारी आहे. पण भोळे साहेबांनी येथे खुलासा करावा जसे नितीन भाऊ म्हणताहेत किंवा ईतर लोकं म्हणताहेत ते होतील तेव्हा होतील.मी जे म्हटंल त्याच्यावर आपण करणार आहोत का आणि कशा पध्दतीने करावे याचा भोळे साहेबांनी खुलासा करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मा.महापौर साहेब अमृतच्या कामाबाबत साहेब तुम्ही लेखी द्या की काम केव्हा चालु होणार आहे. व कोणकोणत्या पध्दतीने होणार आहे. तुम्ही मागच्या वेळेस म्हणाले की वेळ वाढवुन पाहीजे मग आपण वेळ वाढवुन घेतली , तो कोर्टात जाईल म्हणेल की मला परवडत नाही मग याच काय , राहीले मग ड्रेनेज वगैरे व साफसफाई हे आम्ही कुठपर्यंत सहन करायचं .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** मा.महापौर . . .

**श्री.कुलभुषण पाटील :-** सर्व प्रथम आपल्या जळगांव शहरातील जे रस्ते आहेत. जे खराब झालेले आहेत ते ९९ टक्के अमृत योजने मुळे खराब झालेले आहेत.

**श्री.सुनिल महाजन :-** अमृत योजना , एलईडी व साफसफाई मध्ये आपण फेल्युअर झालेले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर ताई आपण या का सर्व बाबींना फेसींग करायला पाहीजे .महापौर ताई व आयुक्त साहेब एलईडीच्या बाबतीत काल पोलन पेठला आग लागली आणि प्लस जिथे चहाचे दुकान होतं अक्षरशः त्या भागात एलईडी लाईट सर्व बंद आहेत. पुर्ण अंधारामध्ये आपल्या मनपाचे दोन व्हेईकल आग विझविण्यासाठी आलेल्या होत्या म्हणजे मोबाईल मधील बॅटरी लावुन सुध्दा आग लागली तेव्हा आपल्या मनपाच्या कर्मचाऱ्यांना तिथल्या उपस्थित नागरीकांनी आपल्या मनपा कर्मचाऱ्यांना मोबाईलचे लाईटस चालु करून त्या खोली मध्ये व बेसमेंट मध्ये उतरण्यासाठी मदत केलेली

आहे , म्हणजे बाहेरचे सर्व लाईटस बंद होते. तरी आपण याची दक्षता घ्यावी . आणि हे सर्व एलईडीचे लाईट कसे चालु होतील याबाबत पहावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब अमृतचे काहीतरी सोल्युशन काढा काम वेळेवर का होत नाहीयेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता सन्मा.सदस्य अमर भाऊंनी २६० चा विषय काढला होता याच्याबाबतीत आयुक्त साहेबांशी माझे बोलणे झाले होते .अंतर्गत कॉलन्यांमध्ये जे रस्ते आहेत साहेब तर मी सांगीतले होते की ती वाळु बाहेर आलेली असते , दगडं बाहेर आलेले असतात , मुरूम बाहेर आलेला असतो , गिट्टी बाहेर टाकलेली असते.आपल्या महाराष्ट्रामध्ये ईतर महानगरपालिकेंमध्ये सि ॲन्ड पी चा जो कॉन्ट्रक्ट चालु आहे. त्या पध्दतीने जर आपण आपल्या महानगरपालिकेमध्ये योजना राबवली .प्रायव्हेट कॉन्ट्रक्टर कडुन ही ज्या कॉलन्यांमध्ये खाजगी कामे चालु असतील त्यांच मटेरिअल रस्त्यावर पडलेल असेल तर त्याला दंडाच्या स्वरुपात तो कॅन्ट्रॅक्टर पावती वसुल करुन ते रस्ते क्लिन करुन घेतो असे एका महानगरपालिकेत बहुतेक अशी योजना आहे. आपण ती जर राबवली. आपल्याला रस्त्यांच्या कचऱ्याचा जो विषय आहे तो मार्गी लागेल.

**श्री.अंनत जोशी :-** मी फक्त खाजगी बांधकामाबद्दल बोललो नाही. रस्त्यांवर जी घान झालेली आहे त्याच्या बद्दल ही बोललो.

**मा.आयुक्त :-** आता रस्त्याच्या संदर्भात जे काही सुचना आलेल्या आहे. आपल्याला डिपार्टमेंटली काय करता येईल ते बघु. आणि सन्मा.सदस्यांनी जे सुचविलं तर निविदा मागवुन ती ही कार्यवाही करावी. ते व्यवस्थित होईल आणि नितीनभाऊंनी जो विषय मांडला. त्या संदर्भात आम्ही एम.जी.पी.शी चर्चा करतो, त्याच्या सी.व्ही. मधुन आपल्याला काही करता आल. त्याबाबत करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जेणेकरुन मी काय म्हटल, आपल्याला जे काही अपेक्षित असेल तसा ठराव करुन टाका. ठरावाची अंमलबजावणी करायची नाही करायची अंतीम निर्णय आपल्यावर राहील. गरज पडल्यास ३ महिन्यानंतर तुम्हाला रद्द ही करता येईल.

**श्री.चेतन सनकत :-** मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेबा, एल.ई.डी.चा विषय असो, अमृतचा विषय असो, भविष्यात जर काही ऑडिट ऑब्जेक्शन निघाल्यास, काही न्यायप्रविष्ठात काही विषय निघाल्यास याला प्रशासन जिम्मेदार राहील ही माझी सुचना नमुद करुन घ्या.

**मा.आयुक्त :-** जे काही निर्णय सभागृह घेतो, त्याची अंमलबजावणी प्रशासन करते, स्वतंत्रपणे याची आवश्यकताच नसते.

**श्री.दंडवते, उपायुक्त आरोग्य विभाग :-** मा.महापौर व सन्मा.सदस्य , एलईडीचे कामं हे डिपीआर तयार करून पुर्ण करणे अपेक्षित होते तसे डिपीआर करण्याचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. आणि महानगरपालिकेने शासनाच्या मार्फत ESSL शी संबंधित करारनामा केला आहे व यासाठी ESSL साधारणत: ८२०० एलईडीचे कामंही केलेले आहे.परंतु शासन निर्णया प्रमाणे पुर्वी डिपीआर तयार करणे त्या डिपीआरला महापालिकेने मंजुरी देणे आणि व त्याच्यापुढील कार्यवाही करणे अश्या या प्रक्रीया राबविणे आवश्यक होते परंतु ESSL ने जो डिपीआर तयार केला होता त्याबाबतीत आम्ही त्यांच्याशी पत्रव्यवहार केला शासनाला आम्ही त्याबाबत कळविलेले आहे. आणि आता त्यांनी डिपीआर तयार करून देण्याचे कबुल केलेले आहे. त्यांच मागील काही सर्वेक्षण पुर्ण झालेले आहे. १८ हजार पैकी त्यांच ५५०० पर्यंतचे सर्वेक्षण पुर्ण झालेले आहे.त्यांना आम्ही मागच्या वेळेस अशी सुचना केलेली आहे की , त्यांचे जे सक्षम अभियंता असतील किंवा साईट इंजिनियर असतील ते येथे थांबणे जरूरीचे आहे आणि ते डिपीआरच्या संदर्भात आपल्याला तसा अहवाल तयार करून देताहेत. अजुन त्यांना सर्वे करून डिपीआर तयार करून देण्यासाठी लागतील . जुने जे लाईटस लावलेले आहेत ते एका पोलवर दोन लावलेले आहेत. एका पोलवर एकच लावावा लागतो याचे कारण असे आहे की त्यांना आपल्याला पुढील सात वर्ष मेंटेंनन्स चा खर्च द्यायचा आहे. ESSL चे दोन काम होते एक म्हणजे संपुर्ण शहरातील लाईटस लावतील आणि एक उर्जेची बचत होईल त्या अनुषंगाने डिपीआर तयार करून घेणे खुप आवश्यक आहे. आता आपण त्या पध्दतीने करून घेत आहोत आणि त्यांनी त्यावर तक्रार न करता प्रतिसाद देत आहेत आणि ते त्याच्यावर काम करीत आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** फक्त तो ठराव करुन घ्या मुख्यमंत्र्यांच्या विनंतीचा की १०० कोटीचा निधी आलेला आहे. तर आपण तो ठराव करुन मुख्यमुंत्र्यांना विनंती करावी व महानगरपालिकेला मदत मिळावी, निधी मंजुर आहे. या प्रस्तावा वरची स्थगिती उठवावी त्याची विनंती मुख्यमंत्री साहेब यांना एक विनंती करावी अशी मी एक विनंती करतो आणि असा एक ठराव करुन घ्या. तसे आयुक्त साहेबांशी चर्चाही झालेली आहे रस्त्यांच्या बाबतीत तो ही आपण एक ठराव करून घेवु. तर हा एक ठराव करून घेण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन :-** विशाल भाऊंनी जी सुचना केली आहे त्याला माझ अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह.) अंतर्गत मौजे मेहरुण स.नं.२८६ (भाग) मधील आरक्षण क्र.२५८, क्रिडांगण स्थलांतरीत करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन

अधिनियमाचे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे बाबत अर्जदार यांनी अर्ज सादर केलेला असुन कलम ३७ अन्वये खालील कार्यवाही पुर्ण केलेली आहे.

१) जळगांव शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/सी.आर.१४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर-१०२ (ए) / ०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर केलेली आहे. व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे.

२) अर्जदार यांची व कुटुंबीयाच्या एकत्रीत मालकीच्या मेहरुण स.नं.२७८/१अ-१ब, १क, स.नं.२८३/१,२,३,४, स.नं.२८४/१,२अ व २ब, स.नं.२८५, स.नं.२८६/१,२ व ३ चे एकुण क्षेत्र २०४०५०.०० चौ.मी मधील एकत्रीत भुमी अभिन्यासास या कार्यालयाचे पत्र क्र.३१६७ दि.२०/०७/२००७ अन्वये तात्पुरती मंजुरी दिलेली असुन त्यास जिल्हाधिकारी जळगांव यांनी आदेश क्र.जमीन/१/१००७/एस.आर/३०/२००७, दि.०६/०४/२००९ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ बीनशेती परवानगी दिलेली आहे.

३) वरील प्रमाणे अभिन्यासास मंजुरी देतांना मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मौजे मेहरुण स.नं.२८६ भाग, आरक्षण क्र.२५८, क्रिडांगण क्षेत्र ५९५०.०० चौ.मी नकाशावर दर्शविण्यात आलेले असुन सदरचे आरक्षणाच्या स्थानात बदल करुन ते उपरोक्त मंजुर अभिन्यासाच्या उत्तर हद्दीलगतचे मौजे मेहरुण स.नं.२८१/१ या अर्जदार यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये दर्शविणे बाबत अर्जदार यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने उक्त आरक्षणाचे स्थानात बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियमाचे कलम ३७ अन्वये महासभेने ठराव क्र.९२२ दि.०५/०५/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

४) महासभा ठराव क्र. ९२२ दि.०५/०५/२०१८ च्या पारीत ठरावा नुसार उक्त आरक्षणाचे स्थानात बदल करणे बाबत ची जाहीर सुचना दै.लोकमत व दै.दिव्यमराठी या वृत्तपत्रात दि.०३/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असुन सदरची जाहिर सुचना शासन राजपत्र दि.२५ -३१ जुलै २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

५) वरील प्रमाणे जाहिर सुचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांका पासुन ३० दिवसाचे विहीत कालावधीत कुठल्याही प्रकारची हरकत/सुचना या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

वरील प्रमाणे कलम ३७ अंतर्गची वैधानिक कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली असल्याने मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मौजे मेहरुण स.नं.२८६ (भाग) वरील आरक्षण क्र.२५८, क्रिडांगण क्षेत्र ५९५०.०० चौ.मी या आरक्षणाच्या स्थानात बदल करुन ते उपरोक्त मंजुर अभिन्यासाच्या उत्तर हद्दीलगतचे मौजे मेहरुण स.नं.२८१/१ पैकी अर्जदार यांच्या मालकीचे क्षेत्र १ हे.१५ आर या अर्जदार यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये दर्शविण्यास शासनाकडे अंतिमत: प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते** :- ६१ **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक** :- **श्री.ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक** :- **श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम १२७ अन्वये अर्जदार श्री.पंकज सुरेश बोरोले यांचेकडून आलेल्या नोटीसी बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) ) मौजे मेहरुण शिवार स.नं.१८३ या जमिनी वरील जळगांव शहर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार आरक्षण क्र.१५४ बगीचा करीता बाधीत अंदाजे क्षेत्र १३७६५.०० चौ.मी. जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.पंकज सुरेश बोरोले यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.पंकज सुरेश बोरोले यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- श्री.ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह.) मौजे मेहरुण शिवार सेक्टर क्र.०६ करीता म.प्रा. व न.र. अधिनियमा चे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाने मंजुर केलेल्या विकास योजना जळगाव (वा.ह) प्रस्तावा प्रमाणे मेहरुण शिवारातील सेक्टर क्र.०६ मधील जमिन लो-राईज लो-डेन्सीटी तत्वावर विकसीत करण्याची तरतुद आहे. त्या ऐवजी जळगाव शहरासाठी लागु असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीनुसार सेक्टर क्र.६ मध्ये विकास परवानगी मिळणेसाठी सौ.स्वप्ना जैन यांनी दि.१८/०७/२०१९ रोजी अर्ज दिलेला होता. त्यावर प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर महासभेने ठराव क्र.१८७,दि.१३/०८/२०१९ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वीत करणेसाठी मान्यता दिलेली आहे. महासभेच्या मान्यतेनंतरचा फेरबदलाची जाहिर सुचना दि.२०/०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन सदरची जाहिर सुचना दि.२१/०८/२०१९ च्या दैनिक लोकमत व दैनिक दिव्य मराठी मध्ये तसेच दिनांक २९/०८/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या शासन राजपत्रात पान क्र.०६ ते ११ वर प्रसिध्द झाली आहे, सदरची जाहिर सुचना प्रसिध्द झाल्यानंतर विहीत मुदतीत एकही सुचना व हरकत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह.) मौजे मेहरुण शिवार सेक्टर क्र.०६ व ०७ च्या हद्दीवरील ३०.०० मी रुंद रस्त्याचे मोबदल्या संदर्भात म.प्रा. व न.र. अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाने मंजुर केलेल्या विकास योजना जळगाव (वा.ह) प्रस्तावा प्रमाणे मेहरुण शिवारातील सेक्टर क्र.०६ व ०७ च्या हद्दीवर ३०.०० मी रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार सदर ३०.०० मी रुंद रस्त्याखालील क्षेत्र जमिन मालकांनी विनामुल्य महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे बंधनकारक आहे.

महासभेने ठराव क्र.६२,दि.०७/१२/२०१८ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वीत करणेसाठी मान्यता दिलेली आहे. महासभेच्या मान्यतेनंतरचा फेरबदलाची जाहिर सुचना दि.२०/०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन सदरची जाहिर सुचना दि.२१/०८/२०१९ च्या दैनिक लोकमत व दैनिक दिव्य मराठी मध्ये तसेच दिनांक २९/०८/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या शासन राजपत्रात पान क्र.०६ ते ११ वर प्रसिध्द झाली आहे, सदरची जाहिर सुचना प्रसिध्द झाल्यानंतर विहीत मुदतीत तीन हरकत अर्ज प्राप्त झालेले आहेत.सदर हरकतदारांना दि.१५/१०/२०१९ रोजी सुनावणीसाठी आयुक्त यांचे दालनात बोलविण्यात आले होते. तथापि, हरकतदार सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत. हरकतदारांनी मुख्यतः भुसंपादन कायद्यातील तरतुदी व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमा चे कलम १२६ मधील तरतुदी बाबत आक्षेप नोंदविलेला आहे. फेरबदला बाबत त्यांनी स्पष्टपणे अभिप्राय नोंदविलेले नाहीत. त्यामुळे हरकतदारांचे म्हणणे फेटाळणेत येऊन सदरचा प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**
**सूचक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**
**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** मंजुर विकास योजना जळगांव (मुळ हद्द) मौजे जळगांव सि.स.नं.९१८२ स.नं.२७५ च्या जमिनीवरील आरक्षण क्र.८५ उद्यान व आरक्षण क्र.८६, सिव्हिक सेंटर ही दोन्ही आरक्षणे वगळुन दोन्ही आरक्षणा खालील जमिन जिल्हा व सत्र न्यायालयासाठी आरक्षित करणेसाठी म.प्रा. व न.र. अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाने मंजुर केलेल्या विकास योजना जळगाव (मुळ हद्द) प्रस्तावा प्रमाणॆ मौजे जळगाव सि.स.नं.९१८२ स.नं.२७५ च्या जमिनीवरील आरक्षण क्र.८५, उद्यान व आरक्षण क्र.८६, सिव्हिक सेंटर या सार्वजनिक कारणासाठी जळगाव महानगरपालिकेकरीता आरक्षित आहेत. सद्यस्थितीत सदर जमिनीवर अस्तित्वातील ट्रॅफिक गार्डन आहे. सदरची जमिन जिल्हा व सत्र न्यायालय जळगाव यांचेसाठी मिळणॆबाबत मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश जळगाव यांनी महानगरपालिकेस विनंती केलेली आहे. त्यावर प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर महासभेने ठराव क्र.१७४, दि.१३/०८/२०१९ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वीत करणेसाठी मान्यता दिलेली आहे. महासभेच्या मान्यतेनंतरचा फेरबदलाची जाहिर सुचना दि.२०/०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन सदरची जाहिर सुचना दि.२१/०८/२०१९ च्या दैनिक लोकमत व दैनिक दिव्य मराठी मध्ये तसेच दिनांक २९/०८/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या शासन राजपत्रात पान क्र.०६ ते ११ वर प्रसिध्द झाली आहे, सदरची जाहिर सुचना प्रसिध्द होण्यापुर्वी श्री.मिर नाजिम अली यांचा दि.३१/०७/२०१९ रोजी सदरची जमिन जिल्हा न्यायालयाकरीता देण्यासाठी हरकत सादर केलेली आहे. सदर हरकतदारांना दि.१५/१०/२०१९ रोजी सुनावणीसाठी आयुक्त यांचे दालनात बोलविण्यात आले होते. हरकतदारांनी सदर फेरबदलास विरोध दर्शविलेला असुन लेखी म्हणणे सादर केलेले आहे. श्री.मिर नाजिम अली यांनी ट्रॅफिक गार्डनला स्वात्रंत्र सेनानी खान्देश गांधी मिर शुकुल्लाह असे नाव आहे. त्यामुळे सदर ट्रॅफिक गार्डनची जागा न्यायालयासाठी देण्यात येऊ नये अशी विनंती केलेली आहे. मिर नाजिम अली यांनी स्वातंत्र सेनानी मिर शुकुल्लाह यांचे नाव अमर राहणेसाठी ट्रॅफिक गार्डन ऎवजी दुस-या बगीचाला नाव देणॆ बाबत पर्याय सुचविलेला आहे. श्री.मिर नाजिम अली यांनी घेतलेली हरकत फेटाळण्यात येऊन सदरचा प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**
**सूचक :- अड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- श्री.पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** मंजुर विकास योजना (जु.ह.) मौजे मेहरुण स.नं.४७५/अ पैकी भुखंड क्र.३९ पैकी या जमिनीवर पाण्याच्या टाकीच्या विस्तारासाठी आ.क्र.१६५, अन्वये आरक्षित क्षेत्र ३८०.८९ चौ.मी. या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम १२७ अन्वये दिलेली नोटीसच्या अनुषंगाने भुसंपादन प्रस्तावाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की,मंजुर विकास योजना (जु.ह.) मौजे मेहरुण स.नं.४७५/अ पैकी भुखंड क्र.३९ पैकी या जमिनीवर पाण्याच्या टाकीच्या विस्तारासाठी आ.क्र.१६५, अन्वये आरक्षित क्षेत्र ३८०.८९ चौ.मी. जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.मोहीत अरुण पाटील व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता

जमिन मालक श्री.मोहीत अरुण पाटील व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय /आदेशाप्रमाणे अवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**

**सूचक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** आरक्षण क्र.४८ ही जागा महानगरपालिका स्वत: विकसीत करणार असल्यामुळे मा.महासभा ठराव क्र.६७७, दि.२०/०६/२०१७ व मा.महासभा ठराव क्र.८३०, दि.२२/१२/२०१७ चे अनुषंगाने आरक्षणाची जमिनी भाडेकराराने दिली होती. सदर ठराव रद्द होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, मौजे जळगाव स.नं.१०१/१,१०१/२ व १०१/३अ आरक्षण क्र.४८ प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळ व प्लेग्राऊंड क्षेत्र १५४२५.०० चौ.मी ही जमिन जळगाव महानगरपालिकने हस्तांतरणीय विकास हक्क च्या मोबदल्यात जमिन मालकांकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेतलली आहे. सदर जागेचे मालकी हक्काच्या ७/१२ उता-या आयुक्त जळगाव शहर महानगरपालिकेचे नाव लागलेले आहे. उक्त मिळकती मध्ये शाळा व स्पोर्ट हॉलचे बांधकाम करणेकामी शहर अभियंता ज.न.पा जळगाव यांचे मार्फत दि.१८/१०/२०१९ रोजी प्रस्ताव नगररचना विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

प्रस्तावित जमिनी पैकी पुर्व दक्षिण कोप-यातील ९००.०० चौ.मी जागा महासभा ठराव क्र.६७७, दि.२०/०६/२०१७ अन्वये श्री.स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय मंडळ जळगाव यांना भाडे पट्ट्याने देणे बाबत ठराव पारीत झालेला आहे तसेच महासभा ठराव क्र.८३०,दि.२२/१२/२०१७ अन्वये पुर्व-दक्षिण कोप-यातील ९००.०० चौ.मी क्षेत्र वगळता उर्वरीत जागे पैकी ८१००.०० चौ.मी जागा विवेकानंद प्रतिष्ठान जळगाव यांना भाडेपट्ट्याने देण्याबाबत ठराव पारीत झालेला आहे. तथापि, आज पावेतो दोन्ही संस्थानी जागा ताब्यात घेण्याबाबत कोणताही अर्ज महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही. मात्र सदर जागेवर महानगरपालिकेने विकास करण्याचे ठरविलेले आहे. त्या अनुषंगाने शाळा व स्पोर्ट हॉलचे बांधकाम करणे बाबत शहर अभियंता यांचेकडून वरील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

वरील दोन्ही संस्थांनी आजपावेतो मागणी केलेली जागा ताब्यात घेणे बाबत कोणतीही मागणी केलेली नाही. त्यामुळे,जळगाव म.न.पाने स्वतः सदर आरक्षणाला विकास करण्याचे निश्चित केलेले असल्याने पुर्वी पारीत केलेले ठराव क्र.६७७,दि.२०/०६/२०१७ व ठराव क्र.८३०,दि.२२/१२/२०१७ रद्द करण्याच्या अटीवर बांधकाम परवानगी पत्र क्र.७३८,दि.०१/११/२०१९ अन्वये देण्यात आलेली आहे. त्यानुसार १) महासभा ठराव क्र.६७७,दि.२०/०६/२०१७ अन्वये श्री.स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय मंडळ जळगाव यांना पुर्व-दक्षिण कोप-यातील ९००.०० चौ.मी जागा भाडेपट्ट्याने देण्या बाबतचा ठराव पारीत झालेला आहे. व २) महासभा ठराव क्र.८३०,दि.२२/१२/२०१७ अन्वये विवेकानंद प्रतिष्ठान जळगाव यांना ८१००.०० चौ.मी जागा भाडेपट्ट्याने देण्या बाबतचा ठराव याप्रमाणे सदर दोन्ही पारीत झालेले ठराव रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय /आदेशाप्रमाणे अवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**

**सूचक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे पिंप्राळा शिवार गट नं.१३०/२ या जमिनीतुन विकास योजना आरक्षण क्र.११३, चिल्ड्रन पार्क करीता आरक्षीत क्षेत्राचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जळगाव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) गट नं.१३०/२ आरक्षण क्र.११३,चिल्ड्रन पार्क या आरक्षणाने बाधीत क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.अरुण डिगंबर मेटकर व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.अरुण डिगंबर मेटकर व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय /आदेशाप्रमाणे अवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**

**सूचक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे पिंप्राळा गट नं.२६० मधील आरक्षण क्र.८४ कोंडवाडा बदल करुन दफनभुमी करणेबाबत कलम ३७ अन्वये फेरबदल करणेचे प्रस्तावाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, महासभा ठराव क्रं १८९ दि.०३/०८/२०१९ व महासभा ठराव क्रं.१९७ दि.२९/०८/२०१९ अन्वये पिंप्राळा गट नं.२६० मधील जागा भिल्ल आदिवासी समाजा करीता दफ़नभुमीसाठी देणेस व अर्धी जागा नाथजोग़ी समाजा करीता दफ़न भुमीसाठी ठराव पारीत करण्यात आलेला असुन जळगाव शहराच्या वगळेलेल्या भागाची विकास योजना जळगाव (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३१ अन्वये सन २००२ मध्ये मंजुर झालेली असुन दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेच्या प्रस्तावा नुसार गट नं.२६० मधील पश्चिम उत्तर कोप-यातील ०.२५ हेक्टर क्षेत्र कोंडवाडया साठी आरक्षित असुन यासाठी समुचीत प्राधिकरण जळगाव महानगरपालिका आहे.

महासभा ठरावामध्ये नमुद असलेली मौजे पिंप्राळा गट नं २६० पै समाजाकरीता दफ़न भुमीसाठी देणे कामी नमुद आहे.तथापी सदरची जमीन वाढीव हद्द मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण क्रं ८४ 'कोंडवाडा' करीता आरक्षीत असुन आरक्षणा खालील क्षेत्र ०.२५ हे इतके आहे अद्ययावत ७/१२ उता-यानुसार मालकी हक्कात आयुक्त जळगाव शहर मनपा तसेच इतर १२ यांची नावे असल्याचे दिसुन येते. सदर गट नं.२६० भाग़ ची जमिन घरकुल योजने साठी खाजगी तडजोडीने संपादन केलेली आहे. केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजने अंतर्गत सदरील गट क्रं २६० मध्ये घरकुल योजना प्रस्तावित आहे. महासभा ठरावाच्या अनुषंगाने तसेच वरील प्रमाणे मंजुर विकास योजना जळगाव( वाढीव हद्द) मधील कोंडवाड्याचे आरक्षण क्रं.८४ हे वगळुन सदरचे क्षेत्र दफनभुमी व त्या लगत ०.२५ हेक्टर हे रहिवास विभागातील क्षेत्र नाथजोगी समाजासाठी आरक्षित करणेसाठी मंजुर विकास योजनेतील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमा चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय /आदेशाप्रमाणे अवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**

**सूचक :- श्री.पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- श्री.भिल पार्वताबाई दामू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १६)** मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह.) मौजे निमखेडी व मौजे जळगांव शिवारातुन प्रस्तावित केलेला वाघुर कॅनाल व त्याला समांतर १८.०० मी वि.यो.रस्ते वगळणेसाठी म.प्रा. व

न.र. अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाने मंजुर केलेल्या विकास योजना जळगाव (वा.ह) प्रस्तावा प्रमाणे मौजे निमखेडी व मौजे जळगाव शिवारातुन वाघुर कॅनाल व त्याला समांतर १८.०० मी वि.यो.रस्ते प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. कार्यकारी अभियंता वाघुर धरण विभाग यांनी मंजुर विकास योजने मध्ये दर्शविलेली वाघुर प्रकल्पाची डाव्या कालव्यावरील असोदा शाखा कॅनालची संरचना बदलेली आहे. त्यांमुळे सदर प्रस्तावित कॅनालची जमिन वाघुर धरण विभागास आवश्यक नसल्याचे कळविलेले आहे. त्यावर प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर महासभेने ठराव क्र.१७१,दि.१३/०८२०१९ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वीत करणेसाठी मान्यता दिलेली आहे. महासभेच्या मान्यतेनंतरचा फेरबदलाची जाहिर सुचना दि.२०/०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन सदरची जाहिर सुचना दि.२१/८/२०१९ च्या दैनिक लोकमत व दैनिक दिव्य मराठी मध्ये तसेच दिनांक २९/०८/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या शासन राजपत्रात पान क्र.०६ ते ११ वर प्रसिध्द झाली आहे, सदरची जाहिर सुचना प्रसिध्द झाल्यानंतर विहीत मुदतीत एकही सुचना व हरकत प्राप्त झालेली नाही.त्यामुळे सदरचा प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीसाठी सादर करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६१ प्रतिकुल मते :-**
**सूचक :- श्री.बालाणी भगतराम रावलमल**
**अनुमोदक :- श्री.पाटील राजेंद्र झिपरु**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(सिमा सुरेश भोळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**